# ५

# शांततेचे दृष्टिकोन

**घटक संरचनाः**

५.१ प्रास्तावना

५.२ विषय विवेचन

५.२.१ राजनय

५.२.२ संयुक्त राष्ट्रसंघ

५.२.३ आंतरराष्ट्रीय कायदा

५.२.४ निःशस्त्रीकरण आणि शस्त्रनियंत्रण

५.३. स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

५.४ सरावासाठी प्रश्न

## ५.१ प्रस्तावना :

आंतरराष्ट्रीय संबंधाच्या एक महत्त्वपूर्ण अभ्यासविषयक म्हणजे प्रामुख्याने दोन राष्ट्रांचा किंवा त्यापेक्षा अधिक राष्ट्रांचा राजकीय, आर्थिक, सामाजिक, लष्करी, व्यापारी, सांस्कृतिक, अशा विविध दृष्टीकोणातून आलेला संबंध होय. कि ज्या संबंधाचा अभ्यास आंतर्राष्ट्रीय संबंधात केला जातो. या संबंधाच्या निर्मितीतून अनेक संघटना निर्माण झाल्यात. त्या संघटनेचा प्रभाव जागतिक राजकारणावर झाल्यामुळेच आतर्राष्ट्रीय संबंधाला या संबंधाचा अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरावे. उदा. नाटो, सिंटो, सेंटो यासारख्या प्रादेशिक संघटनांचा अभ्यास तसेच राष्ट्रसंघ व संयुक्त राष्ट्रसंघ यासारख्या जागतिक संघटनांचा अभ्यास आंतर्राष्ट्रीय संबंधात केल्या जावू लागला. आणि कालांतराने यांनी एक महत्त्वपूर्ण स्थान या अभ्यासविषयात प्राप्त केल्यामुळेच आंतर्राष्ट्रीय संबंधातील एक महत्त्वपूर्ण अभ्यास विषयक म्हणून आज आपल्याला त्याचा विचार करावा लागतो.

## ५.२ विषय विवेचन

### ५.२.१ राजनय

लोक राजकिय संघर्षात मध्यस्थी करण्याचे कार्य करीत ासतात. श्रीकृष्णाची शिष्टाई व्यर्थ ठरल्यानंतरच महायुद्धाला प्रारंभ झाला. असा उल्लेख महाभारतात आहे. अतिप्राचीन विशेष सवलती प्राप्त होत असल्याचा उल्लेख इतिहासात आढळतो अगदी रानटी अवस्थेत देखिल दिवसभर चालले. युद्ध जखमी व मृत सैनिकांना उचलुन नेण्याची गरज वाटल्यामुळे दोन डोळ्यानी परस्परांशी बोलर्णा करून थांबविण्याचे कार्य साधले असले पाहीजे या सर्व घटनांचा संबंध राजनय या संज्ञेशी आहे. निकोल्सन म्हणतात, ''राजनय हि केवळ आजच्या काळाची गरज नसुन अति प्राचिन काळापासुन मानवी जिवनाची ती एक गरज झाली आहे.

इंग्रजी भाषेतील Diplomacy चा समानार्थी शब्द म्हणुन राजनय हि, संज्ञा मराठीत वापरली जाते. डिप्लोमसी म्हणजे 'कुटनीती किंवा कुटौलनीती' असे समजण्याचा असलेला दिसून येतो परंतु डिप्लोमसी ही संज्ञा दोन राज्यामध्ये संबंध करण्याच हेतुने होणाऱ्या व्यवहाराला संबोधण्यासाठी वापरली जाते. दोन राज्यामध्ये होणारा कोणताही व्यवहार सद्भावनेवर अवलंबून असल्यामुळे अशा व्यवहाराला कुटील नीती संबोधन अयोग्य ठरते. त्यामुळे ही शब्द योग्य नसुन राजनय हा योग्य अर्थाचा शब्द ठरतो.

पिटमन पिटरच्या मते राजनय या शब्दाद्वारे असा संबंधाचा व ग्रंथाचा उल्लेख होतो कि, ज्या द्वारे प्रत्येक राष्ट्र आपल्या विविध प्रकारच्या प्रतिनिधीच्या माध्यमाने एकमेकांचा राजनैतिक संबंधाची संचालन करीत असते.

राजनय हा राज्यामध्ये संबंध प्रस्थापित करण्यासाठी केलेला एक तात्पुरता व्यवहार नसुन ती एक सातत्याने सुरु असलेले प्रक्रिया आहे. स्थायी दुतावयास आंतरराष्ट्रीय संमेलने व परीषदा आंतरराष्ट्रीय संस्था प्रचार व संपर्क की सर्व राज्याची साधने आहे. भारताचे राजदुत पाकीस्थान चिन, अमेरीका, आदी देशामद्ये आहे. तसेच अन्य देशाचे हे राजदूत भारतात आहेत. म्हणून राज्याद्वारे निरभुक झालेल्या राजदुताला सभ्यतेची वागणुक व अवध्य म्हणण्याची प्रथा निर्माण होणे स्वाभावीक ठरते. सर्नेस्ट, सॅटो यांच्या मते, राज्याच्या राज्यनितीतील राजकीय संबंधाचा कार्यवाहीत बुद्धीमत्तेचा आपण धावपंजचा वापर म्हणजे राजनय होय. मॉगेन्थॉ यांच्यामते शांततापुर्ण मार्गाने राष्ट्रीय हिताची वृद्धी करणे म्हणजे राजनय होय.

के.एम. पण्णीकर यांच्या मते, राजनय ही आंतराष्ट्रीय राज्यकारणात आपले राष्टीय दुसऱ्या देशाचा संबंधात सादर करण्याची कला होय.

राजनय ही राष्ट्रीय हिताची संरक्षण करण्याचे विदेश निती धोरण अमलात आणण्याचे साधन होय. असा राजनयाचा अर्थ वर उल्लेखित व्याख्यामधुन व्यक्त होतो. राजनय या संकल्पनेचा अर्थाशी संबंधी विविध पैलू  महत्वाचा आहे असे समजुन विचारवंत व्याख्या करतात परीणामी वर उल्लेखीत सर्व व्याख्या वेगवेगळ्या अर्थ व्यक्त करणाऱ्या आहेत असे आपणास वाटते परंतु या सर्व व्याख्यांमधुन राजनयाचा अर्थाचे विभिन्न पैलू व्यक्त होत असल्यामुळे त्या महत्वाच्या ठरतात राजनयाचा वरील विविध व्याख्यावरून राजनयाचा सामान्य व्यवहाराची विवेचन पुढील प्रमाणे करता येईल.

(१) राजनय ही दोन राष्ट्रात सलोख्याची परस्पर संबंध प्रस्थापीत करण्याची कला आहे.

(२) राजनयाचा प्रमुख हेतु दुसऱ्यास न दुखवता आपल्या राष्ट्राचे हित साध्य करणे हा आहे या दृष्टीने राजनीय हे विदेशनीती धोरणाची अंमलबजावर्णा करण्याचे साधन आहे.

(३) राजनयीक संबंधातुन एक राज्याचे अन्य राज्याशी राष्ट्रीय सामाजीक आर्थिक संस्कृतीक हित संबंध प्रस्थापित करणे हे राजनयाचे उद्दिष्ट असते.

(४) राजनयीक कार्यामध्ये आहे किंवा तरजोद करण्यावर भर दिला जातो.

(५) राज्यामधील राजनयीक व्यवहारात उपयोगता आणली जाणारी साधने तंत्रे व व्यवहारी संबंधीत प्रथा अशा लिखित अर्थ बोध राजनय या शब्दावरुन स्पष्ट होतो.

कोणत्या राज्याशी मित्रत्वाचे मित्रत्वाची व सलोख्याचे संबंध, प्रस्थापित करावयाचे व कोणत्या राज्याशी कोणकोणत्या बाबतीत सहकार्य करायचे हे सर्व राष्ट्रीय हित लक्षात घेऊन विदेश निती धोरणार ठरविले जाते.

(१) राजनय हे विदेशनीतीचे साधन आहे. तर विदेशनीती हे राजतयाचे साध्य आहे.

(२) विदेशनीतीचा तुलनेत राजनय हा बदलत असतो. राजनयाची पद्धती देशकालपरिस्थितीनुसार बदल असते. एकाच हेतुच्या पूर्तीसाठी वेगवेगळ्या राजनयिक पद्धतीचा वापर करावा लागतो.

(३) अस्तित्वात असलेल्या परीस्थितीत आपला राष्ट्रीय हेतू साध्य करण्यासाठी राजनयीक यंत्रणा वापरली जाते.

(१) राजनय हे विदेशनीतीचे साधन आहे तर विदेशनीती हे राजनयाचे साध्य आहे.

(२) विदेशनीतीचा तुलनेत राजनय हा बदलत असतो. राजनयाची पद्धती देशकाल परिस्थितीनुसार बदलत असते. एकाच हेतुच्या पूर्तीसाठी वेगवेगळ्या राजनयिक पद्धतीचा वापर करावा लागतो.

(३) अस्तित्वात असलेल्या परीस्थितीत आपला राष्ट्रीय हेतू साध्य करण्यासाठी राजनयीक यंत्रणा वापरली जाते.

**राजनयाची उद्दिष्टे :**

(१) राजनयाची व्याख्या करीत असताना निकोलसनने उद्दीष्टावर प्रकाश टाकला आहे. चर्चा, वाटाघाटी, सल्लामसलती इत्यादीद्वारे राष्ट्राराष्ट्रांमधील सामान्य स्वरूपाचे वादग्रस्त प्रश्न सोडविणे हे राजनयाचे उद्दीष्ट आहे.

(२) चार्लस वेबस्टरच्या मते, कोणत्याही हिसफ प्रकारचा आधार न घेता इच्छित उद्दिष्ट साध्य करणे हा राजनयाचा प्रमुख हेतू होय.

(३) सरदार के. एम. पण्णिकर यांच्यामते आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या संदर्भात आपले राष्ट्रीय हित साध्य करणे हे राजनयाचे उद्दीष्टे आहे.

**राजनयाची किंवा राजनयाची कार्ये :**

आजच्या काळात प्रत्येक राज्याला अन्य राज्यांशी स्थायी स्वरूपाचे राजनयिक संबंध प्रस्थापित करण्याचा सातत्याने करावा लागतो. दोन राष्ट्राची विचार प्रणालीच्या दृष्टीने तात्विक भूमिका वेगवेगळी असली आणि त्याच्यामद्ये संस्कृतिक मतभेद असले

तरीही धनिष्ट स्वरूपाचे राजनयिक संबंध प्रस्थापित करण्याचा बुद्धीःपुरस्पर प्रयत्न केला जातो याचे मूळ कारण आजच्या काळात राजनद्वारे पुढील महत्त्वाच्या कार्याची पूर्ती होत असते.

**(१) राष्ट्रीय हितसंबंधाचे रक्षण :**

प्रत्येक देशाला स्वतःचे असे हिसंबंध असतात व ते जपावे लागतात. अन्य राज्याशि स्थायी स्वरूपाची मैत्री स्थापन करून राष्ट्रीय हित संबंध जपले जातात. आपल्या देशाच्या राष्ट्रीय हिताला बाधा येईल असे निर्णय बाधा येईल विदेशअतील सरकार होणार नाही या दृष्टीने प्रयत्न करणे हे राज्याच्या राजदुताचे कार्य असते.

**(२) युद्ध व संघर्ष टाळणे :**

राजनय हा युद्धाचा पर्याय मानला जातो. राजनय अपयश ठरल्यास युद्धाची घटना निच्छितपणे घडते. कुशल राजदुत चातुर्यानी व मत्सदेगीरीने युद्ध टाळण्याचा प्रयत्न करतो. यशस्वी राजनय कष्टाने युद्ध टाळू शकतात तसेच सोईतासाठी युद्ध घडवून ही आणु शकतो.

**(३) विदेशात प्रतिनिधीत्व :**

आधुनिक काळात प्रत्येक देश आपला प्रतिनिधी किंवा राजदूत आपल्या देशामध्ये पाठवीतात आणि दुसऱ्या देशातुन आपल्या राजदुताचर स्वीकार करतात. राजदूत केवळ सरकारचे प्रतिनीधीत्व करतो असे नाही तर तो आपल्या देशातील जनतेची प्रतिनिधीत्व करीत असतो. त्या देशामधील आर्थिक राजकीय अशा अतीशय महत्वाचा घडामोडीचे वृत तो आपल्या देशात सरकारला कळवतो.

**(४) वाटाघाटी करणे :**

राजदूताचे कार्यच वाटाघाटी करणारा असे स्वरूपाचे असते. संबंधीत नेत्याशी किंवा मान्यवर व्यक्तीशी प्रत्यक्ष व्यक्तिगत संबंध, निर्माण करुन तडजोड किंवा देवाणघेवाणच्यिा मार्गाने समत्वाने करण्याचा प्रयत्न म्हणजे वाटाघाट करणे होय.

**(५) निवेदन करणे (Reporting) अथवा अहवाल पाठविणे :**

आपल्या देशाला अहवाल किंवा निवेदन सादर करण्याची कार्य राजदूताला

पार पाडावे लागते. राजदूत हा खऱ्या अर्थाने देशाचे कान व डोळे असतो. त्याची ज्या देशात नियुक्ती झालेली असते तेथील सर्व घडामोडीचे तो सूक्ष्म निरीक्षण करतो. त्याचा अहवाल आपल्या देशाच्या परराष्ट्र मंत्रालयाकडे पाठवून देतो.

**(६) परदेशातील स्वकीय नागरिकांचे रक्षण :**

आधुनिक काळात व्यापा, शिक्षण, व्यवसाय, पर्यटन इत्यादी कारणांसाठी एका देशातील नागरिक दुसऱ्या देशात जातात. त्यांच्या त्या देशातील वास्तव्याच्या काळात त्याच्यावर कोणताही अन्याय होऊ नये. तसेच त्यांना प्रवासाविषयक परवाने, नागण कायद्याने संरक्षण, योग्य त्या संबंधी इत्यादी प्राप्त करुन देणे हे राजदूताचे कार्य असल्याचे दिसून येते.

**(७) सांस्कृतिक संबंध व आर्थिक सहयोग :**

आधुनिक काळात राजदूताचे कार्य केवळ राजकीय राहीले नसून ते अतिशय व्यापक झाले आहे. आज सांस्कृतीक, सामाजिक शैक्षणिक आणि इतर संबंधात राष्ट्राराष्ट्रांच्या व्यवहारात फार मोठी वाढ व विविधता निर्माण झाल्याने दिसून येते. यामुळे आर्थिक, सांस्कृतिक आणि इतर पाहावे लागत आहे.

**(८) हितसंबंधाचे रक्षण :**

राजदूताने आपले कार्य करीत असताना आपल्या राष्ट्राच्या हितासंबंधांचे रक्षण करण्याचे उद्‌दीष्ट सतत बाळगावे अशी अपेक्षा असते हा दृष्टीकोन स्थायी वाटत असला तरीही राजनयिक प्रक्रियेमध्ये त्याचाच अवलंबन केला जातो.

**राजनयाचे प्रकार**

राजनयाचा विकासाचा इतिहास दोन कालखंडात सामान्यतः विभाजीत करण्यात येतो. प्राचीन काळापासून तो व्हिएन्ना काँग्रेस (१८१५) पर्यंत कालखंड हा प्राचीन राजनयाचा कालखंड म्हणून ओळखला जातो. व्हिएन्ना काँग्रेस ते महायुद्ध १८१५ ते १९१९ या कालखंडातील राजनयाला जुना राजनय असे म्हणतात. पहिल्या महायुद्धानंतरच्या कालखंडातील सर्व राजनयिक व्यवहार हे नवीन राजनयाच्या कक्षेत येतात.

## जुना राजनय व नवा राजनय

(१) जुन्या राजनयाचा अर्थ व स्वरूप : १८१५ ते १९१९ म्हणजे व्हिएन्ना काँग्रेस ते प्रथम महायुद्धापर्यंतचा कालखंड हा जुन्या राजनयाचा कालखंड समजला जातो.

जुन्या राजनयात बोलणी, वाटाघाटी व तह किंवा करार गुप्त ठेवण्यावर अधिक भर दिला जात असे. त्या काळात सर्वत्र निरंकुश राजेशाही होती. त्यामुळे लोकांना विश्वासात घेऊन निर्णय घेण्याची गरज भासत नव्हती राजाचे वेयक्तिक हित सुरक्षित राखणे हाच जुन्या राजनयाचा प्रमुख घेण्याची गरज भासत नव्हती, राजाचे वैयक्तिक हित सुरक्षित राखणे हाच जुन्या राजनयाचा प्रमुख पाया होता. युद्ध शांततेचा निर्णय राजा घेत असे. यामुळे परराष्ट्र धोरण हा राज्यापेक्षा राजधरण्याचे अधिक होते म्हणावे लागते.

जुन्या राजनयाची वैशिष्ट्ये : (१) या कालखंडात दोनहून अधिक प्रबळ राजा अस्तित्वात होता. त्याच्या निश्चित असे संबंध निर्माण झाले नव्हते. त्यामुळे ती आपला अध्यक्ष बदलवून दुर्बल राष्ट्रांच्या पक्षाला मिळत असला सलासंतुलन घडवून आणत असते. बदल राष्ट्र पद्धती व सत्ता संतुलनाला अधिक प्राधान्य ही जुन्या राजनयाची वैशिष्ट्ये आहेत.

(२) या कालखंडातील राजनय हे प्रशिक्षित व अनुभवी होते ते कोणतीही तडजोड करण्यास देवाण घेवाणीची प्रवृत्ती ठेवत असते. व्हिएन्ना करारात फ्रांस अपमानित होणार नाही अशा अटी फ्रांसवर लादल्या. या अशा तडजोड करण्याच्या वृत्तीमुळे युद्ध व संघर्ष टाळले जाते.

(३) जुन्या राजनयाच्या काळात कोणताही प्रश्न प्रतिष्ठेचा न करता तो तडजोडीच्या मार्गाने कसा सोडविला जाईल याचा प्रयत्न राजनय काळात सातत्याने करीत असत. प्रतिष्ठानिरपेक्ष राजनय ही जुन्या राजनयाची एक ठळक वैशिष्ट आहे.

नव्या राजनयाचा अर्थ व स्वरूप : पहिल्या महायुद्धाच्या समाप्तीनंतरच्या कालखंडातील राजनय म्हणजे नया राजनय होय. साम्राज्यवादाची साधी, व्यापारी हितसंबंधात निर्माण झालेला तणाव जलद वाहतुकीची साधने, लोकशाही शासनाचा उदय जलद संपर्काची साधने इत्यादी कारणांमुळे राजनयाचे क्षेत्र हे युरोपपुरते मर्यादीत न राहता जगव्यापी झाले.

**नव्या राजनयाची वैशिष्टये :**

(१) नवीन राजनयाचे कार्यक्षेत्र व्यापक आहे. जुन्या राजनयाप्रमाणे ते युरोपपुरते मर्यादीत नसुन सर्व देशांशी संबंधीत झाले आहे. जलद वाहतुकीच्या साधनांमुळे सर्वच देश परस्परांच्या अधिक जवळ आले आहेत.

(२) नव्या राजनयाच्या कार्यात वाढ झाली आहे. जुन्या राजनयात युद्ध थांबविणे व शांतता प्रस्थापित करणे यावर अधीक भार दिला जात असे आज आर्थिक व्यवहार, सामाजिक व सांस्कृतीक व्यवहार विदेशात राहणाऱ्या नागरीकांच्या अधीकारामध्ये रक्षण अशी अनेक कार्ये राजनयात पार पाडावी लागतात.

(३) जुन्या राजनयात गुप्ततेवर अधिक भर होता. संसदीच पध्दतीमुळे राजनयीक व्यवहाराची चर्चा देशाच्या कायदेमंडळात व वृत्तपत्रामध्ये होते. यामुळे गुप्ततेला फारसा वाव राहीला नाही. युमुळे आधुनिक काळातील राजनय हा खुला राजनय (Open Diplomacy) म्हणून ओळखला जातो.

(४) आधुनिक काळात राजनयिक यंत्रणेमध्ये काम करणाऱ्या राजनयची नेमणूक स्पर्धा परीक्षातून केली जाते. त्यांना विशिष्ट प्रकारचे प्रशिक्षण दिले जाते. थोडक्यात आधुनिक काळातील राजदूत व राजनयज्ञ हा प्रशिक्षित व त्या कार्यातील विशेषज्ञ असतो.

(५) आधुनिक काळातील राजनयाचे वैशिष्ट्य म्हणजे राजदूताच्या निर्णयस्वातंत्र्याची मर्यादा कमी झाली आहे.

(६) आधुनिक जगात सर्वत्र मतभेद व संघर्षाचे वातावरण आहे. जुन्या राजनयाच्या कालखंडात सामर्थ्यशाली राष्ट्र दुर्बल राष्ट्राच्या पारड्यात आपले वजन टाकून संतासंतुलन साधीत असे. यामुळे युद्ध त्वरित समाप्त होत असे आज तशी परीस्थिती राहीली नाही.

**गुप्त राजनय व प्रकट किंवा खुला राजनय :**

(१) गुप्त राजनयाचा अर्थ व स्वरूप : गुप्त राजनय हे जुन्या राजनयाचे एक वैशिष्ट्य मानले जाते. पूर्वी राजनयिक व्यवहार हा केवल शासनापुरतात मर्यादित असल्यामुळे राजे किंवा त्यांचे प्रतिनिधी आपले राजनयिक कार्य साधण्यासाठी अनेक प्रकारचे गुप्त करार करीत असत. या गुप्त कराराची माहीती केवळ राजनयज्ञ व राज व महाजे यांनाच असे उदा. विस्माकने सेनेचे एकीकरण करण्यासाठी माहीत केवळ राजनयज्ञ व राजे व

महाराजे यांनाच असे. उदा. बिस्माकने जर्मनीचे पद संधी व त्रिपक्ष संधी यासारखी गुप्त करार केला.

**गुप्त राजनयाचे गुण दोष :** गुप्त राजनयामुळे आपले राजनयीक उद्दिष्ट साध्य करण्यासाठी योग्य असा मार्ग शोधता येतो कारण करार गुप्त असल्यामुळे इतर देशांचे हितसंबंध दाखवले जाण्याचा संभव असल्यास ते करार घडून येण्यात व्यत्यय निर्माण करू शकत नाही. गुप्त राजनयात राजनयिक व्यवहाराबाबत लोकांना अंधारात ठेवले जाते. परंत त्याचे अनिष्ट परिणाम मात्र जनतेलाच भोगावे लागतात. गुप्त करार केवळ राजयज्ञास माहिती असल्यामुळे त्याच्या मृत्युनंतर गोंधळ निर्माण होतो. गुप्त असफल झाल्यास जनतेचा राज्याकर्त्यांवरील विश्वासच नष्ट होतो.

अश्याप्रकारे आधुनिक काळात गुप्त राजनयाला मर्यादा असल्यामुळे जुन्या राजनयाच्या कालखंडातील गुप्त राजनयाची जागा खुलवा राजनयाने घेतली आहे.

एक किंवा खुल्या राजनयाचा अर्थ व स्वरूप : पहिल्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर अमेरीकेचे अध्यक्ष विलसन यांनी जगाला खुला राजनयाचे आवाहन केले गुप्त करार, परस्परविरोधी भूमिका यामुळे जगात अशांततेचे वातावरण निर्माण झाले होते. पहिले महायुद्ध ऊद्भवले ही परीस्थिती जगात पुन्हा उद्भवू नये म्हणून राजनय हा खुला असावा गुप्त राजनयाच्या तुलनेत खुला राजनय चांगला असला तरीही खुल्या राजनयात राजनयिक व्यवहारात पुढील अडचणी निर्माण झालेल्या दिसून येतात.

### खुल्या राजनयाच्या मर्यादा किंवा दोष

(१) आंतरराष्ट्रीय प्रश्न सोडविण्यासाठी जगातील राष्ट्रे एकत्र येतात खुली चर्चा होत असली तरीही त्यात प्रश्न सोडविणे ही भावना वा भूमिका नसते तर त्या प्रश्नाला अधिक प्रसिद्धी देणे व आपला प्रभाव इतरांवर टाकणे हाच मूळ हेतू त्यामागे असतो.

(२) खुल्या राजनयात लोकांना राजनयिक व्यवहाराची माहीत देणे व लोकमताचा अनुरोधाने प्रश्नन सोडविणे अभिप्रेत असते. परंतु आजच्या काळातही राष्ट्र हिताच्या दृष्टीने संधी किंवा द्विपक्षीय करारामधील काही महत्वपूर्ण बाबी प्रगट करणे घातक असते.

(३) राजनयात होणारी देवाणघेवाण ही परिस्थितीनुरुप असावी लागते. लोकमतावर

आधारित खुल्या राजनयात अशी देवाणघेवाण करणे शक्य होत नाही. कारण देवाणघेवाणीत केवळ लाभ प्राप्त व्हावा परंतु त्याच्या प्राप्तीसाठी काहीही सोडावे लागू नये अशी राष्ट्रांमधील सर्वसामान्य जनतेची भावना असते.

(४) खुल्या राजनयात राजनयज्ञाना लोकमताची भीती बाळगावी लागते तसेच राजनयीक व्यवहाराबाबत अति जागृतता ठेवावी लागते.

**सर्वकषवादी राजनय व लोकशाही राजनय**

सर्वकषवादी राजनयाचा अर्थ व स्वरूप : पहिल्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर इटली, जर्मनी व जमात या देशांमध्ये सर्वकषवाद राजवटीचा उदय झाला. हिटलर, मुसलोनीच्या राजवटीमुळे आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये काही नवे प्रश्न निर्माण झाले.

सर्वकषवाद राजनय हा खोटा प्रचार व असता त्यावर आधारलेला असुन नितितत्वाला पूर्णपणे हा फासणारा आहे. विस्तारवादी धोरण अमलात आणणे हे या राजमयाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. सर्वकषवादी राजनयात कोणत्याही प्रश्नांवर संधी किंवा करार करण्याबाबत तयारी दर्शविली जाते. परंतु केलेले करार सांभाळणावर मात्र फार भर दिला जात नाही. केलेले करार किंवा संधी पडणे हे नैतिकदृष्ट्या आवश्यक आहे असे समजले जात नाही.

लोकशाही राजनवाचा अर्थ व स्वरूप : लोकशाही राजनयाची सुरुवात विसाव्या शतकाच्या प्रारंभी झाली. विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून अनेक राष्ट्रांनी लोकशाही शासनपद्धतीचा स्वीकार करण्या प्रारंभ केला. यामुळे लोकशाही व्यवस्था असणाऱ्या राष्ट्रांमधील संबंध लोकशाही राजनय पद्धतीनेच अस्तित्वात येऊ लागले.

**लोकशाही राजनय पद्धतीची ठळक वैशिष्ट्येः**

(१) या पद्धतीत विवादासाद प्रश्न सोडविण्यासाठी राष्ट्रे तत्वाचा वापर न करात शातंतामय वाटाघाटी, चर्चा व विचार विनीमयाचा आधारे प्रश्न सोपविण्याचा प्रयत्न करतात.

(२) या पद्धतीत नम्रतापूर्ण व्यवहाराला अतिशय महत्व असते तसेच सद्भावना व शिष्टचार यांनाही महत्व असते. यातुन धेशादेशात गाढ मैत्रीवर विश्वास व्यक्त केला जातो.

(३) लोकशाही राजनयाच्या पद्धतीत राज्याराज्यामध्ये झालेले करार सहसा मोडले जात नाहीत, ते पाळण्यास राष्ट्रे वचनबद्ध असतात.

(४) लोकशाही व्यवस्थे राज्यकारभार हा अंतिमतः लोकांसाठीच चालतो. म्हणुन दोन देशांमधील संबंध हे दोन राजदूतांचे नाहीत तर त्यात दोन्ही देशामधील लोकांचे संबंध अंतर्भुत असतात. असे समजले जाते. त्यामुळे लोकशाही राजबंधात लोकांचा पाठींबा मिळविण्याचा प्रयत्न केला जातो.

(५) लोकशाही राजनयात काही वेळा घटनाबद्ध मार्गाचा अबलंब केला. उदा. काही राष्ट्रांना प्रलोभने दाखवून आपल्या गटात ओढले जाते, तर काही विरोधक राष्ट्रांना अमिषे दाखवली जातात, अनेकदा विरोधी प्रचार करण्यावरही भर दिला जातो.

**लोकशाही राजनयातील दोषः**

(१) सर्वसामान्य लोकांना आंतराष्ट्रीय व्यवहारातील गुंतागुंतीची माहीती नसते. त्यात रसही नसतो. परंतु राजनयाच्या बाबतीत अंतिम सल्ला मात्र लोकांकडे त्यामुळे हा राजनय प्रभावी ठरू शकत नाही.

(२) शीघ्र निर्णय त्वरीत अंमलबजावणी राजनयाचे गमक आहे. परंतु या पद्धतीत कायदेमंडळाच्या संमतीशिवाय राजनयज्ञाचा निर्णय घेता येत नाही.

(३) निकोलसन यांच्या मते या पद्धतीत लोकांच्या दडपणाखाली अत्यंत महत्वाच्या व गुंतागुंतीच्या प्रश्नावर चुकीचे निर्णय घेतले जातात.

(४) लोकांची इच्छा हा जसा या पद्धतीचा दोष आहे. तसेच नेते सुद्धा एक दोषच आहे. या पद्धतीत नेहमी देशाच्या धोरणा संबंधी अस्पष्ट व गोंधळ निर्माण करणारे विवेचन करतात.

**व्यक्तिगत राजनय किंवा शिखर राजनय :**

(१) **अर्थ व स्वरूप :** अनेकदा राष्ट्रप्रमुख किंवा शासनप्रमुख हे प्रत्यक्ष वाटाघाटी करण्यासाठी एकत्र असतात. तेव्हा व्यक्तिगत राजनय असे म्हणतात. अलीकडच्या काळात त्यांस शिखर राजनय असे देखील म्हटले जाते. रूझव्हेल्ट यांची १९४१

मधील अटलांटिक महासागरातील शिखर परिषद १९७२ इंदिरा गांधी भुदो यांचा सिमला शिखर परिषद (१) राष्ट्रप्रमुख कविा शासन प्रमुख हेच विदेशनीतीचे निर्धारण करणारे असतात.

(२) शिखर परिषदेत सहभागी होणारे नेते सामान्यतः राष्ट्राचे नेते असतात. त्यामुळे त्यांच्या निर्णयाला कायदेमंडळाचा व लोकमताचा पाठिंबा सहजपणे मिळतो.

(३) शिखर परीषदेत घेलेले निर्णय स्वतःहून घेतले असल्यामुळे त्याचे पालन करण्याची, जबाबदारीही स्वेच्छेने स्वीकारली जाते.

**शिखर राजनयाचे दोष :**

(१) शिखर परीषदेत तडजोड होऊ न शकल्यास पुन्हा चर्चा घडवून आण्यास वाव नसतो. त्यामुळे शिखर परीषदेची असफलता ही अत्यंत हानिकारक स्वरूपाची मानली जाते.

(२) शिखर परीषद ह अत्यंत अल्पकाळ चालते, अशा वेळी आंतरराष्ट्रीय प्रश्नांशी संबंधीत विविध पैलू काळजीपूर्वक विश्लेषण करणे शक्य असते. त्यामुळे शिखर राजनयात व्यक्तीगत मते व पुर्वग्रह यांना महत्व प्राप्त होऊन राज्याच्या हितसंबंधांना बाधा निर्माण होण्याचा धोका असतो.

(३) शिखर परीषदेत सहभागी होणाऱ्या नेत्यांची कोणताही प्रश्न सोडविण्याची अगदी मनापासुन नसली तर शिखर परीषद ही निरूपयोगी आहे. असा युक्तीवाद सर विल्यम यांनी केला आहे.

**संसदीय राजनय :**

अर्थ व स्वरूप : संयुक्त राष्ट्रे संघटनेच्या राजनयाला यांनी संसदीय राजनय असे संबोधिले आहे. कारण संयुक्त राष्ट्रे संघटनेच्या कार्यपद्धतीचे स्वरूप संसदीय कार्यपद्धतीशी आंतराष्ट्रीय जुळणारे आहे. या आंतरराष्ट्रीय संघटनेच्या महासभेत सर्व सदस्य राष्ट्र एकत्र येऊन कोणत्याही आंतरराष्ट्रीय प्रश्नाची चर्चा करतात. हासभेने घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करण्याचे कार्य सुद्धा परीषदेच्या माध्यमातुन केले जाते. अशा प्रकारे संयुक्त राष्ट्रे संघटनेमार्फत आंतरराष्ट्रीय समस्या सोडविणयची व

आंतरराष्ट्रीय शांतता, सहयोग सुरक्षा निर्माण करण्याची जी कार्यपद्धती आहे तिला संसदीय राजनय असे म्हणतात.

**संसदीय राजनयाच्या पद्धतीचे दोष :**

(१) या पद्धतीच्या राजनयात अत्यंत महत्वाचा आंतराष्ट्रीय प्रश्न सोडविण्यात गुंतागुंत निर्माण होते.

(२) संयुक्त राष्ट्रे संघटनेच्या संसदीय राजनयामुळे, आंतरराष्ट्रीय तणाव कमी होण्याऐवजी वाढले आहेत.

(३) यशस्वी राजनयासाठी एखादया प्रश्नावर गंभीर चिंतन आवश्यक असते असे म्हटले जाते. संयुक्त राष्ट्रे संघटनेत अनेक प्रश्नांवर गरम चर्चा होतात.

**परीषद राजनय :**

अर्थ व स्वरूप : प्राचीन काळात वादाशी दोन राष्ट्रे परस्पर एकत्र येऊन आपले प्रश्न सोडविण्याचा व संघर्ष करार करण्याच प्रयत्न करीत हा राजनय द्विपक्षीय राजनय या नावाने संबोधिला जातो. आधुनिका काळात अनेक राष्ट्र एकत्र येऊन समस्यांवर विचारविनिमय करताना आढळतात. यालाच परीषद राजनय किंवा बहुपक्षीय राजनय असे संबोधिले जाते.

**परिषद राजनयाची वैशिष्ट्ये :**

(१) परीषद राजनयात आंतरराष्ट्रीय हिताला प्राधान्य असते. त्यास राष्ट्रीय स्वार्थ किंवा मतभेद यांना फारसा वाव नसतो.

(२) कोणत्याही आंतरराष्ट्रीय समस्येवर विचार करण्यासाठी एकत्र आलेले राजनय अशा परिषदांच्या निमित्ताने एकमेकांना वारंवार भेटत असतात.

(३) अशा परीषदांमध्ये राज्यशासनाने पूर्ण अधिकार दिलेत प्रतिनिधी सहभागी होतात.

(४) परीषदेत होणाऱ्या चर्चा खुल्या स्वरूपाच्या असतात. जागतीक लोकमताला आव्हान देणारे विचार त्यातुन व्यक्त होतात.

**परीषद राजनयाचे गुण :**

(१) परीषद राजनय पद्धती योग्य प्रकारे हाताळली तर यद्ध टाळण्याचा तो एक सर्वोत्तम मार्ग आहे. असे मत लॉर्ड मॉरिस हॅर्क यांनी व्यक्त केले आहे.

(२) परिषद राजनयाच्या पद्धतीची प्रक्रिया अगदी लवचिक असते, सहभागी होणाऱ्याची कमी संख्या अनौपचारिक परस्पर ओळख व वैयक्तिक मैत्रीची निर्मिती हे देखिल या पद्धतीचे विशेष गुण आहेत.

(३) परीषद राजनयाच्या पद्धतीत सहभाग होणारे प्रतिनिधी आपापल्या देशातील जनतेचे प्रतिनिधीत्व करतात. त्यांच्याबरोबर आवश्यकता असल्यास अशा परिषदांमध्ये गोपनियताही ठेवली जाते.

**परिषद राजनय पद्धतीचे दोष :**

(१) परिषदेमध्ये सहभागी होणाऱ्या प्रतिनिधीशी मते पूर्वग्रहदूषित असल्यास त्यांच्या मैत्रीचे संबंध वाढण्याऐवजी परस्परविषयी गैरसमज अधिक दाखवितात व परीषद अपयशी होतात.

(२) परिषदेत आलेले प्रतिनिधी काही वेळा त्या परषदेचा उपयोग आपल्या राष्ट्रीय उद्दिष्टांचा प्रचार करण्यासाठी किंवा विरोधकांचा अपप्रचार करण्यासाठी वापरतात.

(३) नवीन ध्येयवादी राजकारणाच्या काळात परीषद राजनय हा अशक्य स्वरूपाचा झाला आहे. कारण साम्यवादी, भांडवलशाही इत्यादी ध्येयवादाने प्रेरीत झालेल्या राष्ट्रांचे परस्पर एकत्र येणे व चर्चा करणे हे या ध्येयवादी दुराभिमानामुळे अडचणीचे झाले आहे.

**राजनयाचा ऱ्हास :**

राजनय हे राष्ट्रीय धोरणाचे आंतरराष्ट्रीय क्षेत्रात सतासंध नियंत्रित करण्याचे एक साधन आहे. परंतु आधुनिक काळात राजनयाचे महत्व कमी होत आहे असे मानणारा एक विचारवंत गट आहे. राजनयाचा ऱ्हासाची पुढील कारणे प्रो. रॉबर्टसन यांनी दिली आहेत.

**(१) राजनयावर जनतेचा अविश्वास**

(२) दूरसंचार साधनाचा विकास

(३) संसदीय राजनयाचा विकास

(४) आंतरराष्ट्रीय राजकारणात महासत्तांचा उदय

(५) आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप

(६) सत्ता संतुलनाची समाप्ती

**राजनयाचे महत्व किंवा उपययक्तता**

(१) युद्ध टाळणे

(२) राष्ट्रा-राष्ट्रातील संबंध जोडण्यासाठी

## ५.२.२ संयुक्त राष्ट्रसंघ

### ऐतिहासिक पार्श्वभूमी :

पहिल्या महायुद्धाच्या परिणामातून पुढील भविष्यात अशा प्रकारची परिस्थिती निर्माण होवू नये. याकरिता राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात आली. परंतु या राष्ट्रसंघाच्या अपयशातून द्वितीय महायुद्ध निर्माण झाले आणि या द्वितीय महायुद्धात झालेल्या विध्वसंकारी परिणामाची झळ संपूर्ण जगाला सोसावी लागली. याच महायुद्धात अमेरिकेने अण्वस्त्राचा प्रयोग केला व तेव्हापासून आण्विक युग देखिल सुरू झाले. वरिल सर्व पार्श्वभूमी लक्षात घेता यानंतर तिसरे महायुद्ध झाले तर संपूर्ण मानवी जगाची समाप्ती होवू शकते याची जाणीव सर्व राष्ट्रांना झाली. त्यामुळे अशा प्रकारची परिस्थिती पुन्हा निर्माण होवू नये, म्हणून २४ ऑक्टोंबर १९४५ ला संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात आली. त्यामुळेच द्वितीय महायुद्धाच्या परिणामातून व्यापक उद्दीष्टाने निर्माण झालेली एक महत्त्वपूर्ण संघटना म्हणून संयुक्त राष्ट्रसंघाच्या जागतिक राजकारणातील यशापयाशाची कारणीमीमांसा करणे आवश्यक वाटू लागले. व त्यातून ती अधिक उपयुक्त कशाप्रकारे ठरू शकेल. यासंबंधी देखिल अनेक विचार व्यक्त झाले. त्याचेच विवेचन आपल्याला करता येईल.

### कार्ये/उद्दीष्ट्ये/तत्त्वे :

संयुक्त राष्ट्रसंघाची कार्ये/उद्दीष्ट्ये/तत्त्वे खालीलप्रमाणे आहेत. द्वितीय महायुद्धाच्या परिणामातूनच संयुक्त राष्ट्रसंघाची निर्मिती झाली. त्यामुळे तिचे उद्दीष्ट्ये, तत्त्वे व्यापक असणे स्वाभाविकच ठरते. त्यामुळे त्याच्या अभ्यासाला देखिल महत्त्व प्राप्त होते.

संयुक्त राष्ट्रसंघाचा हेतू पत्रिकेत स्पष्ट केलेला आहे. यात मुलभूत मानवी हक्क व व्यक्ती प्रतिष्ठा याचे रक्षण करणे, लहान-मोठी राष्ट्रे व स्त्री-पुरुष समानतेची निर्मिती करणे, आंतर्राष्ट्रीय कायदा करार यांना अनुसरून आंतर्राष्ट्रीय कायदा करार यांना अनुसरून आतर्राष्ट्रीय न्याय प्रस्थापित करणे इत्यादी अनेक स्वरूपाचे हेतू स्पष्ट केले आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या नियमावलीत सुरुवातीलाच तीची उद्दीष्ट्ये स्पष्ट केलेली आहेत, ती पुढीलप्रमाणे :

१. आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षा बोलविणे.
२. स्वयंनिर्णय व समान अधिकार या तत्त्वावर आधारलेले मीप्रत्वाचे संबंध राष्ट्रांराष्ट्रामध्ये विकसित करणे.
३. आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व मानवतावादी प्रश्न सोडविण्यासाठी आणि मानवी अधिकार मुलभूत स्वातंत्र्य याविषयी आदर निर्माण करण्यासाठी सहकार्य करणे व प्रयत्नशील राहणे.
४. ही सामान्य उद्दीष्ट्ये साध्य करण्यासाठी राष्ट्रांच्या प्रयत्नात समायोजन घडवून आणणे.

वरील उद्दीष्ट्य साध्य करण्याकरिता संयुक्त राष्ट्रसंघ साध्य राहील तसेच उद्दीष्टांवरून स्वत:ची कामकाज पद्धती देखिल निश्चित करेल असे स्पष्ट केल्या गेले आहे. त्यामुळे या उद्दीष्यांवरूनच संयुक्त राष्ट्रसंघाची काही तत्त्वे स्पष्ट केल्या गेली ते पुढीलप्रमाणे :-

१. सर्व सदस्य राष्ट्रांचे सार्वभौमत्व आणि समानता हे संयुक्त राष्ट्रसंघाचे पायाभूत तत्त्व होय.
२. प्रस्तुत रचनेद्वारे स्विकारलेली कर्तव्य सदस्य देशांनी प्रामाणिक राहावे.
३. त्यांनी आपअपसातील संघर्ष शांततामय उपयांनी मिटवावेत.
४. संयुक्त राष्ट्रसंघाच्या उद्दीष्टांशी विसंगत होईल अशाप्रकारे बळाचा वापर केला जावू नये.
५. सदस्य राष्ट्रांनी संयुक्त राष्ट्रसंघाला त्याच्या कार्यात सहकार्य करावेत.
६. सदस्य नसलेल्या देशांचेही वर्तन आंतर्राष्ट्रीय शांतता व सुरक्षेला पोषक राहील, असा प्रयत्न करावा.
७. कोणत्याही राज्याच्या अंतर्गत कारभारात संयुक्त राष्ट्रसंघ हस्तक्षेप करणार नाही. मात्र त्या ठिकाणी शांतता भंग होईल किंवा शांततेला बाधक ठरणाऱ्या घटनासंबंधी हा कायदा लागू होणार नाही.

इत्यादी स्वरूपाशी तत्त्वे स्पष्ट केली गेलेली आहेत.

## संयुक्त राष्ट्रसंघाची कार्ये :

संयुक्त राष्ट्रसंघाच्या उद्दोंची कर्तव्याची, तत्त्वांची आपण दखल घेतल्यास याला अनुसरून आतापर्यंत संयुक्त राष्ट्र संघाने जागतिक राजकारणात कोणती भूमिका पार पाडलेली आहे. ती भूमिका पार पाडतांना कोणकोणती कार्ये पार पाडावी लागली, कोणकोणत्या प्रसगांना सामोरे जावे लागले आहे आणि त्यामुळे संयुक्त राष्ट्र संघाबद्दल कशा प्रकारची भूमिका सर्वसामान्यामध्ये निर्माण झालेली आहे. इत्यादी सर्व गोष्टींचा आढावा घेणे आवश्यक ठरते. त्याकरिता सर्वप्रथम संयुक्त राष्ट्रसंघाची कार्ये थोडक्यात स्पष्य करावी लागतात.

### ती कार्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

### १. राजकीय व शांतताविषयक समस्या :

शांतता रक्षणासाठी शस्त्र रुपात व अणुशक्ती नियम याकरिता १९४७ मध्ये साधारण शस्त्रास्त्र आयोग १९४६ मध्ये अणुशक्ती आयोग यांची स्थापना करण्यात आली. १९५२ मध्ये या दोन्ही आयोगाची कामे एकत्र करून एकच निशस्त्रीकरण आयोग स्थापन करण्यात आली. या आयोगाच्या वतीने वाटाघाटी व परिषदा आयोजित करून शस्त्र कपातीचे व अणुशक्ती नियंत्रणाचे प्रयत्न करण्यात आले. परंतु शीत युद्धाच्या वातावरणात या प्रयत्नांना फारसे यश आले नाही. संयुक्त राष्ट्रसंघाच्या स्थापनेपासून राजकीय व शांतताविषयक अनेक आंतर्राष्ट्रीय संबंधातील समस्या समोर येवू लागल्या. १९४६ च्या इरानमदील रशियन सेनेचा प्रश्न, काश्मीर, क्लोन, इंडोनेशियाचे स्वातंत्र्य, १९५० चा कोरीयाचा प्रश्न, १९५६ सुवेन संघर्ष प्रश्न, ग्रीसचा प्रश्न, अरब-इस्त्राईल संघर्ष, तैवानची समस्या, तिबेट इत्यादी अनेक प्रश्न संयुक्त राष्ट्रसंघासमोर निर्माण झाले. इंडोनेशियाचे स्वातंत्र्य व सुवेजचा संघर्ष या प्रश्नांची सोडवणूक करण्यात संयुक्त राष्ट्रसंघाला बरेच यश प्राप्त झाले. तरिपण एकंदरित जगातील राजकीय व शांतता विषयक प्रश्न सुटू शकले नाहीत. मोठ्या राष्ट्रातील संघर्ष व त्यामुळे त्यातून निर्माण झालेले शीत युद्ध हे जरी त्यातील मुख्य कारण असले तरी, संयुक्त राष्ट्रसंघाच्या प्रयत्नामुळे उपरोक्त प्रश्नांवरून संभवणाऱ्या तिसऱ्या जागतिक युद्धाचा भडका टाळला असला तरीही काही बाबतीत संयुक्त राष्ट्रसंघ अपयशी ठरला आहे. असेच आपल्याला म्हणावे लागते. ते अयपश पुढील उदाहरणाद्वारे देता येईल.

१. 'सर्वसमावेशक अण्वस्त्र बंदी करार' या बाबतीत संयुक्त राष्ट्रसंघाचे धोरण काही प्रमाणात स्थायी सदस्यांच्या हीताच्याच दृष्टीने घेतल्या गेलेले आहे. त्यामुळेच या

कराराची कार्यक्षमता कमी झालेली आहे. तसेच या कराराचे एक प्रकारचे राजकारण झाले.

२. १९९०-९१ मधील इराक-कुवेत युद्धात केवळ अमेरिकेच्या स्वार्थाकरिता संयुक्त राष्ट्रसंघाने हस्तक्षेप केला. त्यामुळे या व्यापक उद्देश्याने या संघटनेची निर्मिती झाली होती. त्या उद्देशाला धक्का पोहोचला.

अशा प्रकारे अनेक कारणांवरून संयुक्त राष्ट्रसंघाचे अपयश आपण स्पष्ट करू शकतो. परंतु तिसरे महायुद्ध न होवू देण्यास त्याचे असलेले कार्य लक्षात घेता या संघटनेने महत्त्व मान्यच करावे लागते.

## २. आर्थिक व सामाजिक विकास :

जगात आर्थिक सहकार्य व्हावे व अविकसित देशांचा विकास व्हावा यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने आर्थिक व सामाजिक परिषदेच्या व इतर सर्व संलग्न संबंधाच्या मार्फत वरिल कार्य केलेली आहेत.

१९५० मध्ये 'तांत्रिक सहाय्य कार्यक्रम', संलग्न संस्थांच्या साहय्याने सुरू करण्यात आला. या कार्यक्रमाद्वारे गरजू राज्यांना तज्ञ, यंत्रसामुग्री, इत्यादी मदत केल्या गेली होती. पाणीपुरवठा, शेती, हस्तकला, वाहतूक इत्यादी क्षेत्रात प्रामुख्याने मदत दिल्या जात होती. पहिल्या वर्षात या कार्यक्रमाद्वारे १५० देशांना व प्रदेशांना फायदा झाला. हा फायदा या देशांना व्हावा याकरिता १३,००० तज्ञांची मदत पुरविण्यात आली. तसेच २५,००० विद्यार्थी व शासकीय अधिकारी यांना प्रशिक्षण देण्यात आले. आणि १९९८ मध्ये विशेष निधी सुद्धा स्थापन करण्यात आला. अशा प्रकारचे विविध कार्य करीत असतांनाच त्याचा समावेश संयुक्त राष्ट्रसंघाच्या अहवालात कमी प्रमाणावर झाला असेल. त्यामुळे ज्या देशाचा आर्थिक विकास कमी प्रमाणात झाला असेल, त्यांची योग्य दखल घेवून त्या देशाचा आर्थिक विकासाकरिता 'प्रादेशिक आर्थिक आयोग' ची स्थापना देखील करण्यात आली. इत्यादीवरूनच संयुक्त राष्ट्रसंघाच्या आर्थिक व सामाजिक संबंधीच्या कार्याचा बोध आपल्याला होतो. त्यामुळे त्याचे महत्त्व देखिल आपल्याला मान्य करावे लागेल.

## ३. सामाजिक, मानवी व सांस्कृतिक कार्य :

१० डिसेंबर, १९४७ ला साधारण सभेने (महासभेने) ३० कलमी मानवधिकाराचे

घोषणापत्र स्विकृत केले. जगातील प्रत्येक व्यक्तीला मनुष्य म्हणून काही किमान अधिकार सर्वत्र मिळाले. या हेतूने ही घोषणा करण्यात आली. जिवीत स्वातंत्र्य, वैयक्तिक सुरक्षा, निवास स्वातंत्र्य, संपत्ती विषयक स्वातंत्र्य इत्यादी मूलभूत अधिकारांचा यात समावेश करण्यात आला. १९५० पासून दरवर्षी १० डिसेंबर हा 'मानवी अधिकार दीन' म्हणून पाळण्यात येतो. १९५४ मध्ये 'स्त्रीयांच्या राजकीय हक्कांची सनद' व १९५९ 'बालकांच्या हक्कांची घोषणा' महासभेने स्विकृत केलेली आहे. सर्व मानवांना काही समान अधिकार असावे. स्त्रीयांनाही पुरुषांच्या बरोबरीने समान राजकीय अधिकार असावेत व बालकांच्या विकासाकडे ते प्राधान्याने लक्ष द्यावे यासाठी उपरोक्त घोषणा संबंधाशी जवाबदारी आंतर्राष्ट्रीय संघटनेत स्विकारली आहे. अशा प्रकारची जवाबदारी आंतर्राष्ट्रीय संघटनेने स्विकारणे हे इतिहासातील पहिलेच कृत्य होय. असे म्हणावे लागते. या कृतीवरून संयुक्त राष्ट्रसंघाच्या उद्‌देशातील व्यापकतेची जाणीव आपल्याला दिसून येते. त्यामुळेच त्याचे महत्त्व देखिल मान्य करावे लागते.

## ४. पारतंत्र्यातील राष्ट्रांना स्वंतत्र करण्यासंबंधीचे कार्य (भूमिका) :

द्वितीय महायुद्धाच्या शेवटी जगातील १/४ जनता परतंत्र्यात होती. पारतंत्र्याविषयीच्या घोषणेच्या घटनेत अंतभाव करून संयुक्त राष्ट्रसंघाने त्यांचा मुक्ती कार्याला चालना दिली. त्यामुळे १५ वर्षात ३८ देश मुक्त झाले. इतरांची स्वातंत्र्याची प्रक्रीया झपाट्याने सुरू झाली. या भुमिकेमुळेच साम्राज्यवादावर किंवा वसाहतवादावर एक प्रकारे अंकुश प्रस्थापित झाला. आजही कोणत्याही राष्ट्रांवर सामर्थ्याच्या आधारावर राजकीय वर्चस्व निर्माण करता येत नाही. त्यामुळेच सामर्थ्यशाली राष्ट्रांच्या या वर्चस्वकृतीच्या नियंत्रणात एक प्रकारचे बंधन निर्माण झालेले आहे. यामुळेच यबाबतीत संयुक्त राष्ट्रसंघांची भूमिका आज महत्त्वपूर्ण ठरलेली आहे.

## ५. संलग्न संस्थाची कार्ये :

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या तत्त्वाखाली कार्य करणाऱ्या अनेक संघटना आहेत. त्या आपआपल्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण कार्ये पार पाडीत असतात. उदा. आंतर्राष्ट्रीय 'अशुशक्ती अधिकरण' ही संस्था अणुशक्तीच्या शांततामय उपयोगासाठी प्रयत्न करीत आहेत. मजूर वर्गाची स्थिती सुधारण्यासाठी आंतरराष्ट्रीय मजूर संघटना कार्यरत आहे. अविकसित राष्ट्रांना विकसित करण्याच्या दृष्टीने विविध आर्थिक मदत जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय मुद्रानिधी, यासारख्या संस्था पार पाडीत आहेत. तसेच शैक्षणिक, वैज्ञानिक, सांस्कृतिक आणि जागतिक आरोग्य इत्यादी क्षेत्रासंबंधी संयुक्त राष्ट्रसंघ महत्वपूर्ण कार्य करते.

मानवधिकार संपूर्ण जगात टिकून राहावा याकरिता देखिल तेवढीच प्रयत्नशील आहे. परंतू हे करित असतांना विकसित राष्ट्रांचा प्रभाव त्यांच्या ध्येय धोरणावर देखिल पडत असल्यामुळे एक प्रकारच्या मर्यादा देखिल प्रस्थापित झाल्या आहेत.

## ६. मूल्यमापन :

द्वितीय महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या 'युनोने' जागतिक शांततेच्या क्षेत्रात केलेली कामगिरी आज महत्त्व पूर्ण ठरते. 'युद्ध म्हणजे विनाश' त्यामुळे संघर्षाचे प्रश्न शांततेच्या मार्गाने सोडवावे हा मुख्य उद्देश घेवून 'युनो' जगापुढे आली. युनोने आपल्या भरीव कामगिरीने अनेक राजकीय, आर्थिक, आरोग्यविषयक प्रश्न सोडविले. त्याचप्रमाणे राष्ट्राराष्ट्रांत सांस्कृतिक दवाण-घेवाण यास अनुकूल अशी पाऊले उचलली.

युनोच्या अस्त्विामुळे आज जग तिसऱ्या महायुद्धाच्या भीतीपासून दूर आहे. युनोच्या प्रयत्नामुळेच अनेक ठिकाणी उद्भवलेल्या त्या संघर्षांना जागतिक स्वरूप प्राप्त झाले नाही. इराण-इराक प्रश्न, ग्रीस, लेबनॉन, सुवेझ प्रसंग, बर्लिन तटबंदी, भारत-पाक प्रश्न इत्यादी अनेक प्रसंगी उद्भवलेल्या संघर्षाच्या स्थितीत युनोने हस्तक्षेप करून शांतता प्रस्थापित केली. अनेक कल्याणकारी कार्ये ही युनोच्या यशाची पोचपावती आहे. 'युनोस्को', 'युनिसेफ' आंतरराष्ट्रीय मजूर संघटना हा साहाय्यक संस्थांच्या माध्यमातून युनोने अनेक जागतिक स्वरूपाचे आर्थिक, सामाजिक व आरोग्यविषयक प्रश्ने सोडविली.

असे असले तरी अनेक प्रसंगी/प्रश्नासंबंधी ती अपयशी ठरली. भारत-पाक संबंध मैत्रीचे करण्यात तीला अपयश आले. सशस्त्र स्पर्धा ती रोखू शकली नाही. अमेरिकेच्या बाजूने निर्णय घेणे हे तीचे एकसुत्री धोरण बनले आहे. इ. युनोमधील असलेल्या दोषांचे निराकरण करण्याची गरज आज आहे.

## संयुक्त राष्ट्रसंघाच्या अयशस्वीतेची कारणे :

२४ ऑक्टोबर १९४५ ला निर्माण झालेल्या या संघटनेचे उद्देश किती प्रमाणात सफल झालेले आहे किंवा जागतिक राजकारणात या संघटनेने कोणती भूमिका पार पाडलेली आहे. यावरच त्या संघटनेची यशस्वीता अवलंबून असते. परंतू ज्या उद्देशाने आणि ज्या व्यापक दृष्टीकोणाने निर्माण झालेली ही संघटना अनेक प्रसंगात यशस्वी ठरल्याचे

आढळून येते आणि त्यामुळेच त्या अयशस्वीतेची कारणे शोधणे आवश्यक ठरते. ती कारणे आपल्याला पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. संयुक्त राष्ट्रसंघाला आजही संपूर्ण जागतिक संघटन म्हणून त्याचे स्वरूप तयार झालेले नाही. आतापर्यंत जर्मनी, कोरिया तसेच १९७१ पर्यंत चीन इत्यादींचा समावेश या संघटनेत नव्हता. त्यामुळे विश्वशांती प्रस्थापित करणे हे आपले कर्तव्य नव्हे. अशी भुमिका या संघटनेच्या बाहेरील असलेल्या देशांची होती आणि त्यामुळेच संयुक्त राष्ट्रसंघाच्या कार्यक्षमतेवर विपरित प्रभाव पडल्यामुळेच त्याच्या यशस्वीतेमध्ये बाधा निर्माण झाली असल्याचे दिसून येते.

२. संयुक्त राष्ट्रसंघात सैद्धांतिक विरोधाभास आहे. एकीकडे सर्वच रोग्यांना समान अधिकार आणि सार्वभौमसत्ता प्रदान केल्या गेली. तर काही ठिकाणी मात्र सार्वभौम सत्तेचे संतुलन निर्माण झाले आहे. उदा. सुरक्षा परिषदेत स्थायी सदस्यांना विरोध अधिकार (तर्शी झुशी) प्राप्त झालेला आहे. तसेच न्याय, आंतर्राष्ट्रीय कायदा, राष्ट्रीय आत्मसन्मान इत्यादी बाबतीत देखिल स्पष्ट स्वरूपात भाष्य केलेले नसल्यामुळे या संघटनेच्या सिद्धांतात विरोधाभास निर्माण झाल्यामुळेही संघटना अयशस्वी ठरलेली आहे.

३. अंतर्गत अधिकारी संबंधी स्पष्ट उल्लेख संयुक्त राष्ट्रसंघात केला गेलेला नाही. त्यामुळे कोणत्याही देशाच्या अंतर्गत अधिकारासंबंधी कोण निर्णय घेईल हा देखिल एक प्रश्न समोर उभा राहीला आहे. महासभेच्या द्वारे बरेच निर्णय घेतले जातात. परंतु ते स्थितीला धरून नसल्याने आपल्याला अनेक उदाहरणे देता येईल. त्यामुळेच अंतर्गत अधिकारासंबंधी संयुक्त राष्ट्रसंघाचे कार्य एक राजनैतिक तत्त्व म्हणून राहीलेले आहे.

४. संयुक्त राष्ट्रसंघात यथास्थितीसंबंधी देखिल अस्पष्टता असल्यामुळे त्याचा प्रभाव काही प्रमाणात कमी झाला आहे. त्यामुळे कोणत्या वेळेला कोणती कारवाई केल्या जावी यासंबंधी देखिल या संघटनेचे धोरण अस्पष्ट असल्याचे दिसून येते.

५. संयुक्त राष्ट्रसंघातील बऱ्याच गोष्टींवर होणारे वाद-विवाद आणि त्यांचा निर्णय हा पक्षपातपूर्ण किंवा महासत्तेच्या धोरणाला अनुकूल असेच घेतला गेल्यामुळे विश्वशांती प्रस्थापित करण्यास बऱ्याच वेळेला अडचणी निर्माण झालेल्या आहेत. उदा. रशिया किंवा अमेरिका दोन्ही महासत्तांनी नकराधिकाराचा वापर करून एकप्रकारे विश्वशांती प्रस्थापित करण्यात आशा निर्माण केली आहे.

६. संयुक्त राष्ट्रसंघातील ज्या राष्ट्रांना कायम झाले आहे. ते राष्ट्र बऱ्याच वेळेला आपल्या हितसंबंधाचे संरक्षण करण्याकरिता इतर राष्ट्राने मांडलेल्या विधेयकासंबंधी त्यांनी विरोधाची भूकिा घेतली आहे व एकप्रकारे दुसऱ्या राष्ट्रावर दबाव आणण्याचा देखिल प्रयत्न केला आहे. त्यामुळे या प्रकारची न्यायाची योग्यप्रकारे प्रतिष्ठापना करण्यात संयुक्त राष्ट्रसंघ अपयशी ठरलेली आहे. उदा. भारत व पाक संबंधी काश्मीर व्यवस्था.

७. संयुक्त राष्ट्रसंघातील एक प्रमुख संस्था म्हणून तसेच जनतेचे प्रतिनिधीत्व करणारे संस्थामधून महासभेला महत्वपूर्ण स्थान प्राप्त झाले असले तरीही बऱ्याच निर्णयाबाबत त्यांना सुरक्षा परिषदेवर अवलंबून राहावे लागते. त्यामुळेच एखादा ठराव महासभेने संमत केली असली तरीही सुरक्षा परिषदेच्या सदस्यांना प्राप्त झालेल्या विशेष अधिकारामुळे ते या नियमात बाधा निर्माण करू शकतात. त्यामुळेच संयुक्त राष्ट्रसंघ ही एक स्थायी सदस्यांची व महासत्तेच्या इच्छेप्रमाणे वागणारी एक संस्था होय, असे स्वरूप तीला आता प्राप्त झाले आहे.

८. संयुक्त राष्ट्रसंघाला स्वत:चे निर्णय प्रत्यक्षात आणण्यास इतर राष्ट्रांवर अवलंबून राहावे लागते. तीची स्वतंत्र कोणतीही यंत्रणा नाही. त्यामुळे मुख्यत: निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता तीला स्थायी सदस्यांवरच अवलंबून राहावे लागते. या परिस्थितीमुळेच स्थायी सदस्यांची मनमानी किंवा प्रभाव पडणे स्वाभाविक करते. त्यामुळे या संघटनेने घेतलेले निर्णय निपक्ष असतील किंवा योग्यच असतील किंवा योग्च असतील असे आपल्याला म्हणता येत नाही.
संयुक्त राष्ट्र संघटनेत कोणताही मुद्दा उपस्थित करण्याचा अधिकार इतर अस्थायी संदस्यांनी प्राप्त झालेला आहे. परंतू हा प्रस्ताव स्विकारावा किंवा नाही. स्वीकारावा याबाबत मात्र स्थायी सदस्यांना अधिकार प्राप्त झाल्यामुळे या संघटनेची उपयोगिता बऱ्याच प्रमाणात कमी झालेली आहे.

९. आधुनिक काळातील महासत्तांच्या राजकारणामुळे संयुक्त राष्ट्रसंघाचे महत्त्व कमी झाले आहे. या संघटनेने घेतलेला निर्णय म्हणजे केवळ सल्ला असे त्याचे स्थान उरलेले आहे. कारण या निर्णयाला जोपर्यंत महासत्तेचे समर्थन प्राप्त होत नाही. तोपर्यंत प्रत्यक्ष जागतिक राजकारणात या निर्णयाला महत्त्व प्राप्त होत नाही. त्यामुळेच या निर्णयाला असलेले अस्थिर स्थान बऱ्याच वेळेला युनो (ण. छ.) चा महासचिवांच्या कार्यावर किंवा अधिकारावर देखील अधिकार देखील मर्यादा घालीत असल्याचे आपल्याला दिसून येते.

१०. युनोच्या नियमातील आत्मरक्षा आणि आक्रमण यासंबंधी स्पष्ट स्वरूपाचा फरक केल्या गेलेला नाही. त्यामुळे कोणत्याही राष्ट्राने केलेले आक्रमण हे कोणत्या प्रकारात मोडते हे सांगता येत नाही. त्यामुळेच हा विषय देखील विवादास्पद उरलेला आहे.

११. युनोतील महासभा या संस्थेची कार्यपद्धती देखिल दोषपूर्ण आहे. कारण या विभागात असणारी सदस्यसंख्या आणि प्रत्येक सदस्याला स्वत:चे विचार मांडण्याचे असलेले स्वातंत्र्य यामुळे बऱ्याच वेळेला कोणत्याही विषयावर निर्णय घेतल्या जात नाही किंवा एकच एक विषयावर बराच वेळ चर्चा चालवून देखिल निर्णय घेतल्या जात नाही. अशा प्रकारच्या कार्यपद्धतीमुळे केवळ निर्णय अशक्य होत असल्याचे आपल्याला दिसते आणि ज्या उपयोगितेकरिता महासभा या विभागाची निर्मिती केल्या गेली आहे ते कार्य देखिल योग्यरित्या होत नसल्याचे दिसून येते. त्यामुळेच युनोचे महत्त्व कमी होत चाललेले आहे, असे जाणवते.

१२. महासभेची जी अधिवेशने होतात त्यात बुद्धीमान राजकीय विचारक उपस्थित राहण्यास उत्सूक नसतात. त्यामुळे केवळ सदस्यांच्या उपस्थितीतच या अधिवेशनाचा प्रारंभ होतो आणि त्यात होणाऱ्या चर्चेवर योग्यप्रकारे जो प्रकाश पडणे आवश्यक आहे, तो मात्र न पडताच हे अधिवेशन संपुष्टात येते. त्यामुळे संयुक्त राष्ट्रसंघाचे महत्त्व दिवसेंदिवस कमी होत चाललेले आहे.

१३. युनोचे महत्त्व कमी होण्याकरिता बऱ्याच प्रमाणात प्रादेशिक संघटना देखिल कारणीभूत ठरलेल्या आहेत. कारण या प्रादेशिक संघटना स्वत:च्या गटाचा विकास कसा होईल? यावरच जास्त लक्ष केंद्रीत करीत असल्यामुळे ज्या उद्देशांकरिता युनोची निर्मिती झाली आहे त्याचे महत्त्व कमी होत चाललेले आहे.

१४. युनोच्या महासभा व सुरक्षा परिषदेवर अशी टिका करण्यात येते की, ही दोन्ही विभागे राष्ट्राराष्ट्रातील संघर्षाचे निर्वारण करीत नसून केवळ जागतिक जनमत स्वत:च्या मताला कसे अनुकूल करून घेता येईल यावरच या विभागाचे अधिक लक्ष असते. त्यामुळेच कऱ्याच वेळेला दोन राष्ट्रांमधील संघर्ष कमी करण्यापेक्षा वाढविण्याचे कार्य सुद्दा या दोन विभागांनी केलेले आहे. त्यामुळेच युनोच्या स्थानाला हानी पोहोचलेली आहे.

**संयुक्त राष्ट्रसंघातील दोष दूर करण्यासंबंधी विविध उपाय :**

युनोची निर्मिती ज्या कारणाकरिता झालेली आहे. ती कारणे थोडक्यात लक्षात घेतली तर, आजही युनोची उपयोगिता संपलेली नसल्याचे आपल्याला दिसते. परंतू वरील प्रकारचे अनेक दोष निर्माण झाल्यामुळे त्याच्या उपयोगितेवर प्रश्नार्थक चिन्ह देखिल निर्माण झालेले आहेत. त्यामुळेच यूनोतील हे दोष दूर कशा प्रकारे करता येईल तसेच अधिक सक्षम व प्रभावशाली कसे करता येईल? याचा अभ्यास करणे महत्त्वपूर्ण ठरते.

यासंबंधी विविध उपाय खालील प्रमाणे सांगता येतील.

१. युनोची सदस्यसंख्या किंवा सदसत्व प्राप्त करण्याकरिता सुरक्षा परीषदेची संमती असणे आवश्यक आहे. अशाप्रकारची अट असल्यामुळे

व्यापकता आणावयाची गरज आहे. कारण वेळ पडल्यास अनेक संस्थाने देखिल निर्माण करता आले पाहिजे.

२. जागतिक पातळीवरील प्रत्येक क्षेत्र हे राष्ट्रीय सार्वभौम सत्तेखाली आहे की नाही याची संपूर्ण चौकशी करायाला हवी आरि जे क्षेत्र नसेल, त्या क्षेत्रावर प्रसासकीय सत्ता निर्माण करण्यात यावी.

३. युनोला स्वत:चे कार्य करित असतांना अनेक प्रकारचा खर्च येत असतो. हा खर्च पुरविण्याकरिता स्वतंत्र प्रकारची उपाययोजना असणे आवश्यक आहे. त्याकरिता विकास कर, सेवाकर, इत्यादी विविध प्रकारचे कर लावून युनोकरिता उत्पन्नाची स्वतंत्र सोय करणे देखिल आवश्यक आहे.

इत्यादी विविध उपाय प्रत्यक्षात आणल्यास युनोची कार्यक्षमता वाढून खऱ्या अर्थाने जागतिक संघटनेचे स्वरूप प्राप्त होईल. परंतु त्याकरिता वरील उपाययोजना आवश्यक आहे.

## ५.२.२ आंतरराष्ट्रीय कायदेपद्धती :

आंतरराष्ट्रीय विवाद कायदेशीर पद्धतीने सोडविण्याच्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय न्यायालय

महत्त्वाची भूमिका पार पाडीत असते. १९४६ पासून साधारणत: २५ विवाद न्यायदानासाठी आले आहेत. प्रदेशावरील प्रभुत्व, समुद्री अधिकार क्षेत्र, आंतरराष्ट्रीय कराराचा अर्थ, इत्यादी अनेक प्रकारच्या प्रश्नांमधून निर्माण झालेले वाद सोडविण्यात संयुक्त राष्ट्रसंघाने महत्त्वपूर्ण भूमिका निभावलेली आहे. तसेच संयुक्त राष्ट्रसंघातील 'महासभा सुरक्षा परिषद' यांना कायदेविषयक सल्ला देण्याचे कार्य दखिल आंतरराष्ट्रीय न्यायालयाने केले आहे. आंतरराष्ट्रीय कायद्याचा विकास व सहजीकरण करण्यासाठी १९४९ मध्ये महासभेने 'आंतरराष्ट्रीय विधी आयोग' स्थापन केले. या आयोगाच्या प्रयत्नाने १९५८ मध्ये सागरी कायद्याबद्दल चार आंतरराष्ट्रीयअभिसंधी करण्यात आल्या. बऱ्याच राष्ट्रांनी या संधीला मान्यता देखिल दिली. तसेच १९५० मध्ये आंतर्राष्ट्रीय कायद्याची तत्त्वे कोणती. १९५४ मध्ये मानव जातीच्या शांतता व सुरक्षा विरोध गुन्ह्यांची संहीता, इत्यादी स्पष्टीकरण करण्याचे कार्य देखिल आंतरराष्ट्रीय न्यायालयाने केले आहे. त्यामुळेच असे म्हणावे लागते की, आंतरराष्ट्रीय क्षेत्रात कायद्याचे राज्य निर्माण व्हावे यादृष्टीने आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे स्थान अधिक महत्त्वपूर्ण ठरले असल्याचे दिसून येते.

## आंतरराष्ट्रीय कायदा

### * आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील संघर्ष नियंत्रित ठेवण्या एक महत्वपूर्ण साधन:

सार्वभौम राज्याची सत्ता व कृती नियंत्रित करण्याचे एक महत्त्वपूर्ण साधन म्हणजे आंतरराष्ट्रीय कायदा होय. सत्ता संतुलन, सामुहिक सुरक्षा ही देखील आंतरराष्ट्रीय संबंधाचे नियमण करणारी साधने आहेत. या साधनाचा परिणामकरक वापर आंतरराष्ट्रीय संबंधाना स्थैर्य प्राप्त करून देतो. परंतु या साधनापेक्षाही अधिक सर्वसाधारण आणी सातत्य असलेले साधन म्हणजे आंतरराष्ट्रीय कायदा होय. शांतता व युद्ध या दोन्ही काळात राज्या-राज्याची वर्तन पद्धती निर्धारीत व नियंत्रित करण्याचे कार्य आंतरराष्ट्रीय कायद्याद्वारे होते. त्यामुळेच आंतरराष्ट्रीय कायद्याला आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील संघर्ष नियंत्रित ठेवण्याचे एक महत्वपूर्ण साधन माणल्या जाते.

### * आंतरराष्ट्रीय कायद्याची व्याख्या व अर्थ :

विभिन्न राष्ट्रे परस्पर संबंध निश्चित करण्यासाठी जी लीखीत व अलीखीत (प्रथा संकेत इत्यादी) या स्वरूपातील नियमावली स्विकृत करतात तिलाच आंतरराष्ट्रीय कायदा

असे म्हणतात. आं. कायदा या सज्ञेचा हा अर्थभाव व्यक्त करणाऱ्या प्रमुख व्याख्या पुढील प्रमाणे आहेत.

'ओपेनहाईम' यांच्या मते ''सभ्य राष्ट्रे परस्परात व्यवहार करताना संकेत आणी परंपरा यावर आधारीत जे नियम कायदेशिरीत्या बंधनकारक मानतात, अशा नियमांचा समुच्चय म्हणजे आं. कायदा होय.'

'हँन्स क्लेसन' यांच्या मते ''सभ्य राष्ट्रांना परस्परामध्ये व्यवहार करणे ज्यामुळे शक्य होते अशा नियम व सिद्धांताचे संकलन म्हणजे आं. कायदे होय.''

'लॉरेन्स' यांच्या मते, ''सुसंस्कृत राज्यामधील सामान्य समुहाच्या परस्पर व्यवहाराचे निर्धारण करणाऱ्या नियमांना आंतरराष्ट्रीय कायदे असे म्हणतात.

वर उल्लेखीत आंतरराष्ट्रीय कायद्याच्या अर्थाचे विवेचन पुढीलप्रमाणे करता येईल.

१) आं. कायदे हे सार्वभौम राज्याची स्विकृत केलेले असतात. म्हणजे त्याचे पालन करण्यास राज्याची मान्यता असते. आं. कायद्याचा हा अर्थभाव व्यक्त करण्यासाठी त्यांची व्याख्या करतांना विभिन्न लेखकांनी सभ्य राष्ट्रे सुसंस्कृत राष्ट्रे या सारख्या शब्दाचा उपयोग केला आहे.

२) आंतरराष्ट्रीय कायदा हा राज्याच्या परस्पर व्यवहाराशी संबंधित प्रथा, परंपरा, संकेत, नियम व सिद्धांत यांचा एकत्रित समुच्चय आहे.

३) आंतरराष्ट्रीय कायद्याचा विषय कोणता याबाबत विचारवंतामध्ये मतभिन्नता असल्याचे दिसून येते.

उदा. लॉरेन्स यांच्या मते आं. कायद्याचा संबंध प्रामुख्याने राज्यामधील समुहाच्या परस्पर व्यवहाराशी आहे. 'फेनविक' यांच्या मते, राज्याचे हक्क व त्या हक्काचे रक्षण करण्याची कार्यपद्धती हा आं. कायद्याचा विषय आहे.

अशा प्रकारे राज्ये आंतरराष्ट्रीय संस्था व संघटना आणि विभिन्न देशात राहणाऱ्या लोकांचे परस्पर संबंध याच्याशी संबंधीत आं. कायदे आहे. आं. कायद्याचे क्षेत्र अतिशय व्यापक असल्यामुळे त्याचा संपूर्ण बोध कोणत्याही एका व्याख्यावरून होने शक्य नाही, असे म्हणता येईल.

*** आ. कायदा आणि राष्ट्रीय कायदा यातील फरक :**

आंतरराष्ट्रीय कायद्याचे स्वरूप समजुन घेण्यासाी आं. कायदा आणि राष्ट्रीय कायदा यातील फरक लक्षात घेणे आवश्यक ठरते. आं. कायदा आणि राष्ट्रीय कायदा यातील मुलभूत फरकाचे विवेचन पुढीलप्रमाणे करता येईल.

*** नियमण करण्याचे क्षेत्र :**

राष्ट्रीय कायदा हा राज्यांतर्गत व्यक्ती–व्यक्तीमधील आणि राज्य–व्यक्तीमधील संबंधाचे नियमण करतो. तर आं. कायदा हा सामाण्यपणे राज्या–राज्यांतर्गत संबंधाबाबत असतो.

*** उगमस्थान :**

दोन्ही प्रकारचे कायदे काही प्रमाणात रुढी, प्रथा व परंपरा यातून निर्माण झालेले आहेत. परंतु राष्ट्रीय कायद्याचे प्रमुख उगमस्थान राज्याचे कायदे मंडळ असते, तशा प्रकारचे सर्वश्रेष्ठ कायदेमंडळ आं. कायद्याची निर्मिती करण्यासाठी नाही. आं. परिषदा व आंतरराष्ट्रीय करार यातुन आं. कायदे निर्माण होतात.

*** अंमलबजावणी करणारी यंत्रणा :**

राष्ट्रीय कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी कार्यकारी मंडळ आणि प्रशासकीय नौकरवर्ग अशी स्वतंत्र यंत्रणा असते. आं. कायद्याच्या अंमलबजावणीसाठी अशी कोणतीही यंत्रणा नाही.

*** न्यायालयीन प्रक्रीया :**

न्यायालयीन प्रक्रीयेबाबतही या दोन कायद्यामध्ये मुलभूत स्वरूपाचा फरक आहे. राष्ट्रीय कायद्याचा अर्थ प्रतीपादीत करण्याचे कार्य राज्यातील सुसंघटीत अशा न्यायव्यवस्थेकडून होत असते. आं. कायद्यानुसार न्यायदान करण्याचे कार्य जगातील विविध राज्यामधील न्यायालये करतात. आं. न्यायालही आं. कायद्यानुसार न्यायदान करण्याचे कार्य करते. अशा प्रकारे आंतरराष्ट्रीय कायद्याबाबतची न्यायालयीन प्रक्रीया ही पूर्णत: विकेंद्रित आहे.

## * लिखित स्वरूप :

राष्ट्रीय कायदा हा लीखीत व निसंदिग्ध स्वरूपात असतो. आं. कायद्याचे काही प्रमाणात संहतीकरण झाले असले तरी आजही ही कायदा बऱ्याच प्रमाणात रुढी व परंपरांवर आधारलेला व संदिग्ध स्वरूपात आहे.

## * आं. कायदा खऱ्या अर्थाने कायदा आहे काय?

आंतरराष्ट्रीय कायद्याचे स्वरूप कोणते याबाबत विचारवंतामध्ये सर्वात जास्त मतभिन्नता आहे. राष्ट्रीय कायदा व आं. कायदा यामध्ये मुलभूत स्वरूपाचा फरक आढळून येतो. यामुळे अनेक अभ्यासक विशेषत: ब्रिटीश विचावंत आं. कायदा हा खऱ्या अर्थाने कायदाच नव्हे असे प्रतिपादन करतात.

जॉन आस्टीन या ब्रिटीश विचारवंताने सार्वभौमसत्तेच्या दृष्टीकोनातून कायद्याची व्याख्या केली आहे. त्यांच्या मते ''सर्वश्रेष्ठ सत्तेने आपल्या अधिकार क्षेत्रातील व्यक्तीच्या वर्तणुकीबाबत केलेला नियम म्हणजे कायदा होय.'' कायद्यासंबंधी जॉन आस्टीनचा हा दृष्टीकोन मान्य असणारे विचारवंत आं. कायदा हा खऱ्या अर्थाने कायदा नाही हा विचार पुढील मुद्याच्या आधारे प्रतीपादीत करतात.

## * अंमलबजावणी करणारी यंत्रणा :

ऑस्टीनच्या मते, आं. कायद्याला 'कायदा' असे संबोधणे योग्य नाही कारण कायदा म्हणजे सर्वश्रेष्ठ सत्तेने आपल्या अधिकार क्षेत्रातील कनिष्ठास दिलेला हुकूम होय. आं. क्षेत्रात असा हुकूम देणारी कोणतीही सर्वश्रेष्ठ सत्ता नाही. तसेच आं. कायद्याचे सक्तीने पालन करवून घेणारी यंत्रणा नाही. प्रत्येक राज्य सार्वभौम असल्यामुळे आं. कायद्याच्या स्वरूपात आज्ञा देणारी सर्वश्रेष्ठ सत्ता निर्माण होऊ शकत नाही. म्हणून आं. कायद्याला कायदा असे संबोधणे योग्य ठरत नाही.

## * कायदा निर्माण करणारी वैधानिक सार्वभौम सत्ता :

कायदा हा नेहमी वैधानिक सार्वभौम सत्तेकडून निर्माण केला जातो. आं. क्षेत्रात अशी कोणतीही वैधानिक सार्वभौमसत्ता नाही की जीच्याकडून आं. कायदा मंजूर होऊ शकेल.

*** सार्वभौमसत्तेचे अथवा दंड सत्तेचे पाठबळ :**

कायद्याचे पालन न करणाऱ्यास शिक्षा होणे आवश्यक आहे. कायद्याच्या मागे दंड सत्तेचे पाठबळ नसेल तर कायद्याचे अस्तीत्व धोक्यात येते. आं. कायद्यामध्ये दंडसत्तेचे पाठबळ नाही. आंतरराष्ट्रीय न्यायालयाने जरीही निर्णय दिला तरीही तो निर्णय मानने अथवा न मानणे हे पूर्णपणे सार्वभौम राज्याच्या इच्छेवर अवलंबून असते. ज्या-ज्या राष्ट्रानी आं. कायदा मोडला तर त्या-त्या राष्ट्राला शिक्षा कोन करेल व कशी करणार हा प्रान आहे म्हणून आं. कायदा हा खऱ्या अर्थाने कायदा नव्हेच.

*** कायद्याबाबत एकवाक्यता नाही :**

कायद्याचे स्वरूप स्पष्ट असते. तो निसंदिग्ध असतो. परंतु आं. कायदा हा स्पष्ट व निसंदिग्ध स्वरूपाचा नाही. त्यात कोणती तत्वे अंतर्भुत असावीत याबाबत सर्व राज्यामध्ये एक वाक्यता निर्माण होवू शकत नाही. तसेच विभिन्न राज्यामधील आर्थिक, सामाजिक व राजकीय परिस्थिती भिन्न असल्यामुळे कायद्याबाबत एकवाक्यता होवू शकत नाही आणि म्हणूनच आ. कायदा हा कायदा नव्हे.

*** राज्या-राज्यामधील कायदा :**

आंतरराष्ट्रीय कायदा हा राज्या-राज्यामधील कायदा आहे तो राज्या-राज्यावरील कायदा नाही. त्यामुळे त्याचे पालन करणे किंवा न करणे ही राज्यासाठी एक ऐच्छीक बाब आहे. आणि जिथे ऐच्छीक बाब असते तेथे कायदा निर्माण होवू शकत नाही.

*** लोकमताचा आधार :**

कायद्याला लोकमताचा आधार असेत. परंतु आं. कायद्याला लोकमताचा आधार नाही. काही राज्ये लोकशाही पद्धतीची तर काही हुकूमशाही, तर काही साम्यवादी पद्धतीची आहे. त्यामुळे ही सर्व परस्पर विरोधी राष्ट्रे एखाद्या आं. कायद्याला जागतीक लोकमताचा पांठिबा मिळवू शकत नाही. लोकमताचा आधार नसलेला कायदा हा खऱ्या अर्थाने कायदा असुच शकत नाही.

*** आंतरराष्ट्रीय नैतीकतेचे नियम :**

आस्टीनवादी विचारवंताच्या मते, आंतरराष्ट्रीय कायदे हे खऱ्या अर्थाने कायदे नसुन ते

केवळ आंतरराष्ट्रीय नैतीकतेचे नियम आहे. अश प्रकारे आं. कायदे हे खऱ्या अर्थाने कायदे नाहीत, असे मानणार आस्टीनवादी विचारवंताचा एक गट आहे.

परंतु कायद्याच्या स्वरूपाबात जॉन आस्टीनवादी विचारवंताशी सहमत नसणारा विचारवंताचा एक गट आहे. सर हेन्री मेन, हॉल, ओपनहाईम, लॉरेन्स आदी विचारवंताच्या मते आं. कायद्यास कायद्याचेच स्वरूप आहे. तो खऱ्या अर्थाने आं. कायदाच आहे. हे पुढील मुद्याच्या आधारे स्पष्ट करता येईल.

### * आस्टीनचा दृष्टीकोन चुकीचा :

या विचारवंताच्या मते, कायद्याचे स्वरूप हे सहमतीचे असते. शांतता व सुरक्षितता या दृष्टीने राष्ट्रीय कायद्याला लोकांची संम्मती असते. त्याचप्रमाणे आं. क्षेत्रात सुद्धा विभिन्न राष्ट्रे स्वेच्छेने व सहमतीने परस्परावर नियत्रंण ठेवण्यासाठी कायद्याला मान्यता देतात. स्वतंत्र व सार्वभौम राज्यानी सहमती दिलेल्या कायद्यांना आं. कायद्याचे स्वरूप प्राप्त होऊ शकते.

### * दंडसत्ता हा कायद्याचा आधार नसतो :

केवळ दंडसत्तेमुळे कायद्याचे पालन होते हा विचार बरोबर नाही. नीती हा सुद्धा कायद्याचा आधार आहे. लोकशाही व सांसदीय शासन पद्धतीचा उदय होण्याच्या पूर्वकालखंडात आस्टीनने हे विचार मांडले आहे. आज परिस्थितीत बदल झाल्यामुळे आस्टीनचे विचार हे काल विसंगत ठरतात हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

### * कायद्याच्या पालनाचे अन्य आधार :

केवळ दंड सत्ता हाच एकमेव कायद्याचे पालन करण्याचा आधार नाही. रुढी, प्रथा, परंपरा हे सुद्धा कायद्याचे आधारस्तंभ आहे. आं. नैतीकता तसेच कल्याण हे सुद्धा आंतरराष्ट्रीय कायद्याचे आधार आहे, अशा प्रकारे कायद्याचे आधार अनेक आहेत हे मान्य केले तर आं. कायदा हा खऱ्या अर्थाने कायदा ठरतो.

### * आंतरराष्ट्रीय कायद्यामागे शक्तीचे पाठबळ :

आं. कायद्याला केवळ नितीनियम समजू नये. आवश्यकता पडल्यास त्यांच्या अंमलबजावणीसाठी बळाचा व शक्तीचा वापरही करता येतो. कांगो या आफ्रीकेतील देशात बळाचा वापर करूनच संयुक्त राष्ट्रे या संघटनेने शांतता प्रस्थापीत केली.

आर्थिक बहीष्कार हे सुद्धा आजच्या काळातील सर्वात प्रभावी शस्त्र आहे म्हणूनच आं. कायद्याचे पालन पुर्णत: ऐच्छीक आहे, असे समजणे चुक ठरते.

## * आंतरराष्ट्रीय कायद्याचा भंग हा निष्फळ युक्तीवाद :

आं. कायद्याचा भंग होतो म्हणून त्यास कायदा म्हणता येणार नाही. हा युक्तीवाद निष्कळ स्वरूपाचा वाटतो. कारण युक्तीवाद ज्यांनी मांडला त्या आस्टीनच्या काळात संयुक्त राष्ट्रासारखी आं. संघटनाच निर्माण झाली नव्हती. राज्यानी केलेले कायदे सुद्धा काहीवेळा पाळले जात नाही. त्यामुळे कायद्याच्या मुलभूत स्वरूपात फरक नाही, त्याचप्रमाणे संयुक्त राष्ट्रे या आं. संघटनेने केलेल्या कायद्याचा काही वेळा भंग होतो. म्हणुन त्यास कायदे न समजणे हे चुकीचे ठरते.

## * आंतरराष्ट्रीय कायद्याची व्याप्ती :

आज आं. कायद्याची संख्या प्रचंड आहे हे जरी सत्य असले तरीही अनेक विचारवंताच्या मते अनेक महत्त्वाचे विषय अद्यापही आं. कायद्याच्या कक्षेबाहेर आहेत. म्हणजे अनेक महत्त्वाच्या विषयावर आं. कायदेच निर्माण झाले नाही. उदा. नागरीकांना त्यांच्या राज्याकडून मिळणारी वागणूक, एका देशातून दुसऱ्या देशात स्थलांतरीत होणाऱ्या लोकांचे प्रश्न, आं. राजकारणातील तटस्थतता इत्यादी.

तसेच प्रथा, परंपरा यावर आधारीत असणाऱ्या आंतरराष्ट्रीय कायद्याचे सहतीकरण झाले आहे व होत आहे. करार व संधी यातून निर्माण होणारे आंतरराष्ट्रीय कायदे लीखीत स्वरूपातच असतात अशा प्रकारे आधुनिक काळात बहुतांश आं. कायदे लीखीत स्वरूपात आहेत. तरीही आं. कायदे हे संदिग्ध स्वरूपाचे आहेत असेच म्हणावे लागते. कारण त्याचा अर्थ लावण्याचा अंतीम अधिकार राज्यांना आहे. यामुळे कराराचा किंवा आं. कायद्याचा आपआपल्या सोईनुसार अर्थ लावण्याची मोकळीक राज्यांना प्राप्त होते.

## * आंतरराष्ट्रीय कायद्याचे उद्‌देश व स्वरूप :

राज्या-राज्यामधील संबंधाचे नियमण करणे हा आंतरराष्ट्रीय कायद्याचा उद्‌देश आहे. याबाबत विचारवंतामध्ये एकमत आहे. परंतु कोणत्याही राज्याचा नागरीक आं. कायद्याने निश्चित केलेल्या कर्त्यव्याबाबत जबाबिंदार किंवा उत्तरदायीत्व आहे कही शनाही

याबाबत विचारवंतामध्ये मतभिन्नता आहे. द्वितीय महायुद्धाच्या समाप्तीपासून याबाबत असलेली मतभिन्नता अद्यापही कायम आहे. महायुद्धाच्या काळात राज्यातील शासनाच्या आदेशानुसार कृती करणारे जर्मन अधिकारी आं. कायद्यानुसार युद्ध-गुन्हेगार ठरू शकत नाही, असे मत किंवा विचार त्या काळात काही विचारवंतानी मांडले होते. याउलट जर्मन अधिकारी हे युद्ध गुन्हेगारच आहे, असे मत काही विचारवंतानी मांडले होते. परंतु या प्रश्नाबाबत अद्यापही एक वाक्यता नाही. म्हणून व्यक्तीच्या संदर्भात आंतरराष्ट्रीय कायद्याचा उद्देश कोणता हा एक वादग्रस्त प्रश्न आहे, असे म्हणावे लागते.

आंतरराष्ट्रीय कायद्याच्या स्वरूपाबाबतही विचारवंतामध्ये एक वाक्यता नसल्याचे आढळून येते. जॉन आस्टीनवादी विचारवंत आं. कायदा हा खऱ्या अर्थाने कायदाच नाही, असा युक्तीवाद करतात, तर काही विचारवंत कायद्या संबंधी ऑस्टीनचे विचार कालबाह्य झाले आहेत, असे प्रतिपादन करून आं. कायदा हा खऱ्या अर्थाने कायदाच आहे, असा युक्तीवाद थोडक्यात तात्वीकदृष्ट्या आं. कायदा आहे की, ते आंतरराष्ट्रीय नितीमत्तेचे नियम आहे, याबाबत विचारवंतामध्ये मतभिन्नता आहे.

### * आंतरराष्ट्रीय कायद्याचे महत्त्व/भूमिका :

### * सुव्यवस्थित आंतरराष्ट्रीय संबंधाचा आधार :

आं. कायद्याला अनेक मर्यादा आहेत. त्याच्या स्वरूप व उद्देशाबाबत मतभिन्नता असल्यामुळे आं. कायदा हा खऱ्या अर्थाने कायदाच नाही असेच काही विचारवंताना वाटते, असे असुनही आं. संबंधाबाबत आं. कायद्याची भुमिका महत्वपूर्ण असल्याचे कोणीही नाकारू शकत नाही. आं. संबंध हे अधिक सुरळीत आण सुव्यवस्थित आं. कायद्याच्या आधारेच होवू शकतात. राज्या-राज्यामधील आर्थिक सांस्कृतीक, राजकीय असे सर्व प्रकारचे संबंध सतत वृद्धीगत होत आहे. अशा स्थितीत त्यांच्यामध्ये सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी कायद्याची नितांत आवश्यकता आहे. तसेच राजकीय प्रतीनीधी, राजदूत यांचे विशेषाधिकार आं. कायद्यामुळेच सांमजस्याने येऊ शकतात.

### * राज्या-राज्यामधील व्यापारी संबंधाचा आधार :

विभिन्न राज्यामधील व्यापारी संबंध सुरळीत राहण्यास आं. कायद्याची फार मोठी मदत झाली आहे. व्यापारी संबंध हे राज्यांच्या द्विपक्षिय किंवा बहुपक्षिय संबंधामधुन निर्माण होतात. अशा करारातून प्रस्थापीत झालेल्या अनेक नियमांना आं. कायद्याचे

स्थान मिळाले. आंतरराष्ट्रीय पोस्टल सेवा, समुद्रमार्ग होणारी जल वाहतुक, आंतरराष्ट्रीय विमान सेवा, आदीचे सुव्यवस्थित संचालन आं. कायद्याच्या निर्मितीमुळेच शक्य झाले आहे.

*** राज्याच्या पुर्वापार भुमिकेत बदल :**

प्रत्येक राज्य सार्वभौम आहे. या राष्ट्र-राज्य व्यवस्थेच्या आधारभुत तत्वाला आं. कायद्यामुळे कोणताही धक्का बसत नाही. आं. कायद्याने युद्ध बेकायदेशीर ठरविले नाही परंतु रणांगणावरील जखमीची सेवा, युद्ध कैद्यांना द्यावयाची वागणुक, रासायनिक शस्त्राचा उपयोग, आदी विषयासंबंधीच्या आं. कायद्यामुळे युद्धातील अमानुषता कमी होण्यास बरीच मदत झाली आहे. राज्यातील जनतेला कोणते अधिकार द्यावयाचे ही राज्याच्या अधिकार क्षेत्रातील बाब आहे. परंतु कोणत्याही राज्यातील मानवी समुहाला किमान कोणते हक्क प्राप्त झाले पाहीजेत हे मानवी हक्काच्या जाहीरनाम्याने स्पष्ट केले आहे. मानवी हक्काचा जाहीरनामा हे मानवी समुदायाच्या दृष्टीने आं. कायद्याद्वारे महत्वपूर्ण योगदान आहे. युद्धामधील अमानुषता आणि राज्यातील जनतेला दिली जाणरी वागणूक ही आपल्याच अखत्यारीतील बाब आहे. ही राज्याची पूर्वीपासून सुरू असलेली भूमिका थोडी फार तरी बदलण्याचे कार्य आंतरराष्ट्रीय कायद्याच्या निर्मिती व विकासामुळे झाले आहे, असे म्हणता येते.

*** तांत्रिक, वैज्ञानिक क्षेत्रातील विकास कार्यात मदत :**

संपूर्ण जगात तांत्रिक, वैज्ञानिक क्षेत्रातील विकासकार्य सुरळीत चालू राहण्यास आंतरराष्ट्रीय कायद्याची मदत होत आहे. अंतराळ क्षेत्र, अंटार्टीकाचे क्षेत्र, महासागरामधील खनिज संपत्ती व नैसर्गिक साधनसामग्री, सागरी सीमा, इत्यादी विषयाबाबत आं. कायदे करण्यात आले आहेत. या सर्व क्षेत्रात विभिन्न राज्यांना संशोधन व विकास कार्य सुरू ठेवण्याबाबत आं. कायद्याने मोलाचे सहाय्य झाले आहे.

*** आंतरराष्ट्रीय संघर्षाच्या नियमनाचे व नियंत्रणाचे साधन :**

कायद्याची निर्मिती व अंमलबजावणी या दृष्टीने आं. कायद्याला अनेक मर्यादा आहेत, असे असुनही आं. कायद्याचे राज्याकडून पालन होत असल्याचे आढळून येते. आं. कायद्याचे पालन करण्याचे राज्यानी स्वत:वर बंधन घालून घेतले तर आं. क्षेत्रात

अधिक स्थायी स्वरूपाची शांतता प्रस्थापीत होऊ शकेल, असे विचारवंताना वाटते.

''आंतरराष्ट्रीय कायदे हे सार्वभौम राष्ट्रांना विश्वसमुदायात परिवर्तीत करतात.'' असे क्विन्सी राइट यांनी म्हटले आहे. आं. शांततेच्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय कायद्याचे महत्व स्पष्ट करतांना पामर व पर्रकिन्स म्हणतात, ''आंतरराष्ट्रीय कायदे वैधानिक व्यवस्था निर्माण करतात. या कायद्याअभावी जागतीक शांततेस धोका निर्माण होऊ शकतो.''

### * मुल्यांकन

आंतरराष्ट्रीय कायद्याच्या स्वरूपाबाबत विचारवंतामध्ये तिव्र स्वरूपाची मतभिन्नता आहे. आस्टीनवादी विचारवंताचा गट आंतरराष्ट्रीय कायदा हा खऱ्या अर्थाने कायदा आहे, हे मान्य करण्यास तयार नाही, तर आं. कायदा हा खऱ्या अर्थाने कायदाच आहे, असे प्रभावी समर्थन करणारा विचारवंताचा दुसरा गट आहे.

अशा प्रकारे आंतरराष्ट्रीय कायद्याच्या स्वरूपाबाबत दोन्ही विचारवंताच्या गटामध्ये अंशीक सत्यता आहे. म्हणुनच आं. कायद्याचे स्वरूप राष्ट्रीय कायद्यापेक्षा भिन्न आहे. तत्वत: आंतरराष्ट्रीय कायदा हा कायदा असो वा नसो. त्यांचे पालन मात्र केले जाते. आं. संबंध सुरळीत राहण्यासाठी काही नियमांचे पालन करणे जरूरीचे आहे. त्यामुळेही त्याचे पालन केले जाते, असे म्हणता येईल. त्याला कायद्याऐवजी नियम, असे संबोधील्याने त्याचे महत्व कमी होत नाही.

## ५.२.३ नि:शस्त्रीकरण आणि शस्त्रनियंत्रण अर्थ

जागतिक शांतता भंग होण्याचे कारण राष्ट्रा-राष्ट्रातील संरक्षण शक्तीच्या माध्यमातुन सोडविण्यासाी राष्ट्रा-राष्ट्रात सुरू झालेली शस्त्रस्पर्धा होय. पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धाच्या संघर्षात जी दोस्त राष्ट्रे विजयी झाली. त्याचे कारण त्यांच्याजवळ असलेली, त्यांनी निर्माण करून उपयोगात आणलेली भयानक शस्त्रे आणि अस्त्रे हेच होते. जगाचा विशाश काही तासाच्या अवधीत घडवुन आणणारी अण्वस्त्रे काही राष्ट्रांनी निर्माण केली. राष्ट्राला आपले संरक्षण करण्यासाठी आक्रमक राष्ट्राला धडा शिकविण्यासाठी शस्त्राचा वापर, त्याचा अधिकार देणे म्हणजे मानवी जीवन कायमचे नष्ट करणे होय, म्हणुनच युद्धे टाळण्याची असतील तर इतर उपाययोजना उदा. सामुहिक सुरक्षितता, सत्तासंतुलन ह्यासारखेच महत्व निशस्त्रीकरणाला आहे.

नि:शस्त्रीकरणाद्वारे भविष्यकाळात निर्माण होणाऱ्या शस्त्रास्त्रांवर प्रतिबंध घालता येत

नाही; परंतु शस्त्रनियंत्रामुळे भविष्यकाळात निर्माण होणाऱ्या शस्त्रास्त्राच्या निर्मितीवर बंधने घालता येतात. निशस्त्रीकरण शस्त्रावर नियंत्रण घालते. तर शस्त्रनियंत्रण शस्त्रस्पर्धेवर नियंत्रण घालते. शस्त्रनियंत्रणाशिवाय कधी कधी निशस्त्रीकरण करता येते. तसेच नि:शस्त्रीकरणाशिवाय शस्त्रनियंत्रण कधी कधी करता येते.

असे असले तरीही शस्त्रनियंत्रण हा नि:शस्त्रीकरणाला पर्याय नसुन शस्त्रविरहीत जगाची निर्मिती करण्यासाठी ती आवश्यक गोष्ट ठरली आहे. निशस्त्रीकरणाला अनेक अर्थ प्राप्त होतात. उदा. साधारण, सामान्य, मानवीय व भौतीक युद्धसामुग्रीचे निशस्त्रीकरण वगैरे; परंतु शस्त्रनियंत्रणाला असे विविध अर्थ प्राप्त होत नसतात.

अशा प्रकारे शस्त्रनियंत्रण आणि नि:शस्त्रीकरण ह्या संकल्पना जागतिक शांतता निर्माण करण्यास पोषक असल्या तरी त्या एक नाहीत.

**नि:शस्त्रीकरणाचे प्रकार :**

नि:शस्त्रीकरण ही संकल्पना व्यापक अर्थाने वापरल्या जाते. त्यामुळे तिचे अनेक प्रकार पडतात.

**१) गुणात्मक निशस्त्रीकरण :**

ह्यामध्ये विशीष्ट प्रकारचीच शस्त्रे नष्ट करावी असे ठरविले जाते. उदा. हायड्रोजन बॉम्ब.

**२) मात्रात्मक निशस्त्रीकरण :**

सर्व प्रकारची शस्त्रे संपुर्णपणे किंवा काही प्रमाणात नष्ट करावी, असे प्रतिपादन केल्या जाते.

**३) व्यापक नि:शस्त्रीकरण :**

सर्व प्रकारची शस्त्रे आणि त्यांचे उत्पादन करण्याची प्रक्रिया थांबविण्यात येणारे निशस्त्रीकरण हणजे व्यापक नि:शस्त्रीकरण होय.

### ४) सक्तीचे नि:शस्त्रीकरण :

सक्तीने किंवा दबावाने केलेले निशस्त्रीकरण उदा. पहिल्या महायुद्धानंतर जर्मन व जपानचे निशस्त्रीकरण सक्तीने केले होते.

### ५) ऐच्छिक नि:शस्त्रीकरण :

जेव्हा राज्यसंस्था स्वेच्छेने नि:शस्त्रीकरणाला मान्यता देते तेव्हा तिला ऐच्छीक नि:शस्त्रीकरण असे म्हणतात. हे निशस्त्रीकरण जबरदस्तीच्या नि:शस्त्रीकरणाचे विरोधी असते.

### ६) स्थानिक नि:शस्त्रीकरण :

ह्यामध्ये काही राज्ये स्वत:च्या पुरतेच नि:शस्त्रीकरण करते.

## राष्ट्रसंघाने नि:शस्त्रीकरणाबाबत केलेले प्रयत्न

निशस्त्रीकरणाचे प्रयत्नकार पुर्वीपासून झालेले दिसतात. कॅनडा आणि अमेरीका ह्यांच्यामधील सरहद्दीचा प्रश्न मिटविण्यासाठी १८१७ मध्ये रश फॉगाट करार झाला. १८६० साली रशियाच्या झार राजाने ब्रिटन, ऑस्ट्रिया आणि फ्रान्स ह्यांच्याशी नि:शस्त्रीकरणाबाबत आणि शस्त्रकपातिबाबत बोलणी केली. १८९९ मध्ये रशियाचा झार निकोलस दुसरा ह्याने हेश येथे पहिली जागतिक शांतता परिषद बोलाविली. त्याला २८ राष्ट्राचे प्रतिनीधी उपस्थित होते. शस्त्रनिर्मितीवर बंधने घालणे, सैन्यावरील खर्च कमी करणे, ह्यावर चर्चा झाली. परंतु काहिच निष्पन्न झाले नाही.

राष्ट्रसंघाच्या संविधानाच्या ८ व्या कलमात शांतता प्रस्थापिण्यासाठी शस्त्रकापीतीच आवश्यकता सर्व सभासद राष्ट्रांनी मान्य केली. त्यानुसार १९२१ मध्ये अस्थायी मिश्र आयोगाची निर्मिती झाली. त्या कमीशनणे नि:शस्त्रीकरणाबाबत पुढील प्रयत्न केले.

१) प्रत्येक राष्ट्राला किती सैन्याची आवश्यकता आहे? ते ठरविण्याचा प्रयत्न केला.

२) वार्शिग्टन संमेलनात राष्ट्राची नाविक शक्ती सीमित करण्याचा प्रयत्न केला.

३) जिनेव्हा प्रीटीकॉलनुसार आक्रमक राष्ट्राविरुद्ध प्रतिबंध लावण्याचा प्रयत्न केला.

४) आंतरराष्ट्रीय वाद शांततेच्या मार्गाने सोडविण्याबाबत विचार केला.

परंतु ह्यापैकी कोणत्याही प्रयत्नाला यश आले नाही.

त्यानंतर १९२५ मध्ये राष्ट्रसंघाने पुर्वतयारी आयोग स्थापन केले. ह्या आयोगाने नि:शस्त्रीकरणाबाबत १९३० मध्ये एक योजना मंजुर केली. त्यातील काही तरतुदी अशा आहे.

१) युद्धसांमुग्रीवर अर्थसंकल्पाद्वारे लक्ष ठेवणे.

२) सैनिकसंख्या भेदभाव न करता कमी करणे.

३) सैनीकांचा सेवाकाळ कमी करणे.

४) रासायनिक व जैवीक युद्ध होऊ न देणे.

**जिनेव्हा संमेलन १९३२ :**

ह्या संमेलनात ६१ राष्ट्रांच्या प्रतिनिधींनी भाग घेतला. त्यामध्ये

१) राष्ट्रसंघाच्या अंतर्गत सैनिक दल स्थापन करणे.

२) रासायनिक व जैविक शस्त्रास्त्रनिर्मितीवर बंधणे घालणे.

३) आंतरराष्ट्रीय संघर्ष कायद्याच्या आधारावर सोडविणे.

परंतु अस्थायी आयोग, पुर्वतय्यारी आयोग आणि जिनेव्हा संमेलनातील निशस्त्रीकरणाबाबतचा कोणताही ठराव प्रत्यक्षात अमलात आला नाही. ह्याच काळात नि:शस्त्रीकरणावर टाकलेला बहिष्कार, रशिया आणि फान्स ह्यांनी सुरक्षिततेवर दिलेलला भर आदी कारणामुळे राष्ट्रसंघाच्या बाहेरील निशस्त्रीकरण करण्याबाबत पुढील प्रयत्न झाले.

१) १९२१-२२ चे वॉशिग्टंन संमेलन

२) १९२७ चे जिनेव्हा संमेलन

३) १९३० ची लंडन नौसेना संमेलन

४) १९३५-३६ चे लंडन नौसेना संमेलन

५) १९३५ ची इंग्लंड व जर्मनी संधी

परंतु हे सर्व प्रयत्न अयशस्वी ठरले. ह्याची कारणे अशी आहेत.

१) प्रत्येक राष्टाने राष्टहिताला प्राधान्य दिले.
२) आंतरराष्ट्रीय नियमांचे उल्लघन करणाऱ्या राष्ट्रविरुद्ध कार्यवाही करण्याची राष्ट्रसंघाची दुर्बळता.
३) शस्त्रास्त्रांच्या निर्मीती व उपयोगाबाबत राष्टा-राष्टातील भेद.
४) राष्टांची निशस्त्रीकरण करण्याची मानसीक तयारी नसणे.

त्यानंतर स्थापन झालेल्या संयुक्त राष्टसंघाने नि:शस्त्रीकरणाबाबत जे प्रयत्न केले. त्यांचा आढावा घेणे आवश्यक आहे.

### ५.२.४ संयुक्त राष्ट्रसंघ आणि नि:शस्त्रीकरण

**राष्ट्रसंघाच्या अपयशचा परिणाम म्हणुन दुसरे महायुद्ध झाले.**

ह्या महायुद्धात अमेरीकेने सरतेशेवटी अणुबॉम्बचा उपयोग करून हजारो सैनीक आणि असैनीक लोकांना मृत्युमुखी पाठविले. त्यामुळे युद्धसमाप्तीनंतर स्थापन झालेल्या संयुक्त राष्ट्रसंघाने निशस्त्रीकरणाचा प्रामुख्याने विचार केला. त्यानुसार नि:शस्त्रीकरणाबाबत अनेक योजना, परीषदा आणि सम्मेलने झाली आणि आजही होत आहेत आणि भविष्यातही होत राहणार. यादृष्टिने त्यांचा थोडक्यात परामर्श घेणे योग्य ठरेल. त्या योजना, सम्मेलणे आणि परिषदा खालीलप्रमाणे :

### योजना, संमेलने आणि परिषदा

### १) परमाणु उर्जा आयोग १९४६ :

परमाणु उर्जानिर्मितीवर बंधने घालण्यासाठी १९४६ साली ह्या आयोगाची स्थापना झाली; परंतु महाशक्तीच्या राष्ट्रानी मतभेदामुळे हा आयोग अयशस्वी ठरला.

२) नि:शस्त्रीकरण आयोग :

ह्या आयोगाची स्थापना १९५२ साली युनोच्या महासभेने केली. शस्त्रास्त्रामध्ये घटकरणे,

नि:शस्त्रीकरणासंबंधी करार करणे, ही कार्य या आयोगाकडे सोपविली; परंतु महाशक्तीच्या व इतर प्रमुख राष्ट्राच्या जाणुनबुजुन केलेल्या दुर्लक्षामुळे हा आयोग यशस्वी झाला नाही.

३) शांततेसाठी परमाणु आयोग :

अणुशक्तीचा उपयोग फक्त शांततेसाठीच करावा ह्या उद्देशाने हा आयोग निर्माण झाला. परंतु ह्या आयोगाच्या उद्देशाबाबत महाशक्तीच्या राष्ट्रात झालेल्या मतभेदामुळे हा आयोग निष्फळ ठरला.

४) १९५५ चे जिनेव्हा संमेलन :

१९५५ साली संयुक्त राष्ट्रसंघाने प्रमुख राष्ट्रांनी जिनेव्हा येथे संमेलन भरविले. ह्या संमेलनात राष्ट्रा-राष्ट्रात उत्पन्न झालेल्या मतभेदामुळे परमाणु शक्तीच्या विकासावरील प्रतिबंध घालणारे उपाय फोल ठरले. आणि निशस्त्रीकरणाच्या बाबतीत सोव्हीएट रशिया इतपर सहकार्य करणार नाही, असे सोव्हिएट रशियाने ठणकावुन सांगितले.

५) १९६० आणि १९६२ चे नि:शस्त्रीकरण संमेलन :

१९६० साली १० राष्ट्रांचे आणि १९६२ साली १८ राष्ट्रांचे नि:शस्त्रीकरण संमेलन जिनेव्हा येथे भरली. परंतु नि ठाण व्यवस्थेबाबत झालेल्या मतभेदामुळे ही दोन्ही संमेलने व्यर्थ ठरली.

६) आंशिक परीक्षण बंदी करार :

५ ऑगस्ट १९६३ रोजी अमेरिका, रशिया आणि इंग्लड ह्या देशांनी आंशिक परीक्षण बंदी करार केला. त्यानुसार त्या देशांनी आपल्या अधिकार क्षेत्रातल्या कोणत्याही ठिकाणी अणुविस्फोट करण्यास व अणुस्फोटाला प्रोत्साहन देण्यास बंदी केली; परंतु अण्वस्त्रांच्या विक्रीवर बंदी न घालणे आणि कराराचा अर्थ संबंधीत राष्ट्राने आपल्या सोयीनुसार लावणे ह्यामुळे हा करार जवळपास असफल ठरला.

### ७) १९६६ ची राष्ट्राध्यक्ष जॉन्सनची सात सुत्री योजना :

नि:शस्त्रीकरणाबाबत राष्ट्राध्यक्ष जॉन्सनने सात सुत्री योजना मांडली. यामध्ये महागड्या शस्त्रनिर्मितीवर भर देऊ नये, आक्रमक व सुरक्षात्मक प्रक्षेपणास्त्रांच्या विकासावर

बंदी घालणे, अणुविकास कार्यक्रमाची पाहणी करणे यासाठी आंतरराष्ट्रीय संघटनेची निर्मिती करणे अशि महत्त्वाची तत्वे त्यामध्ये होती, परंतु अमेरिकेने नाटो, सिंटो व प. जर्मनीला शस्त्रास्त्रांचा पुरवठा केला आहे. ह्या कारणामुळे ही सात सुत्री योना असफल ठरली.

## ८) १९६८ ची परमाणु अस्त्र निर्माण व प्रसार प्रतिबंधक संधी :

नि:शस्त्रीकरण आयोगाने मांडलेली एक योजना युनोच्या महासभेने १९६८ साली स्वीकारली. तीला महाशक्तीच्या आणि जागतिकदृष्ट्या महत्वाच्या अशा एकूण ४० राज्यांनी मान्यता दिली.

त्यानुसार अण्वस्त्रधारी राष्ट्रांनी इतर राष्ट्रांना अण्वस्त्र प्राप्त करण्यासाठी मदत करू नये, अण्वस्त्रहीन राष्ट्रांनी अण्वस्त्रे बनवु नये, अण्वस्त्राचा उपयोग विकासासाठी करावा. अशा अटींचा समावेश ह्या करारात केला. त्या कराराला १०० राष्ट्रांनी मान्यता दिली.

## ९) १९७१ सालची न्युक्लीअर फ्री सीबेड ट्रिटी :

समुद्र तळ आणि महासमुद्र तळ हे अण्वस्त्रे आणि संहारक अस्त्रे ह्यांपासुन मुक्त ठेवण्यासाी ११ फेब्रुवारी १९७१ रोजी इंग्लंड, अमेरीका व रशिया ह्यांच्यामध्ये एक करार झाला. त्यात १९ कि.मी. प्रादेशीक समुद्राचा भाग वळवण्यात आला. ह्या संधीला युनोच्या महासभेने मान्यता दिली. परंतु ह्यामध्ये वरील तीन राष्ट्राचाच फायदा होणार असल्यामुळेच भारत व चीनने सही नाकारली.

## १०) १९७९ ची साल्ट १ आणि साल्ट २ संधी :

ह्याला डींरींशसळल अीाा ङ्ळाळींरींळेप ढीशरीं असे म्हणतात. महाशक्तीच्या शस्त्रास्त्रांवर नियंत्रण घालण्याच्या दृष्टिने ह्या संधी झाल्या. साल्ट १ संधीच्या वेळी शस्त्रास्त्र स्पर्धा कमी करण्याच्या दृष्टिने विचार करण्याचे ठरले.

## ११) मध्यम मारा परमाणु प्रक्षेपास्त्र संधी :

हा करार अमेरिका व रशिया मध्ये झाला त्यानुसार ह्या दोन्ही राष्ध्रांनी ५०० ते ५००० कि.मी. अंतरावर जमिनीवरून मारा करणारी प्रक्षेपास्त्रे नष्ट करण्याचे मान्य केले.

ह्या योजना, संमेलने आणि परिषदांमधुन नि:शस्त्रीकरणाच्या संकल्पनेच्या अभ्यास स्पष्टपणे आपण करू शकतो.

## नि:शस्त्रीकरण मर्यादा

नि:शस्त्रीकरणाबाबत आजपावेतो जे प्रयत्न झाले त्यांना अपेक्षीत यश आले नाही. ह्याचे कारण महाशक्तीच्या राष्ट्रातील तणाव, त्यांचा राष्ट्रीय स्वार्थ हे आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे जी नवनवीन शस्त्रे आणि परमाणु अस्त्रे निर्माण झाली. त्यामुळे नि:शस्त्रीकरण प्रक्रिया अधिकाधीक गुढ बनली आहे. निशस्त्रीकरण करणे ही समस्या दिवसेंदिवस उग्र बनली आहे. त्या प्रक्रियेत अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत.

### १) आत्मसंरक्षण :

नि:शस्त्रीकरणाशी संबंधीत राष्ट्र हे नेहमीच स्वत:च्या संरक्षणाचा विचार करते. कोणत्याही राष्ट्राला प्रथम सुरक्षिततेची आणि आक्रमकांविरुद्ध संरक्षणाची हमी मिळाल्याशिवाय कोणतेही राष्ट्र नि:शस्त्रीकरणाला तयार होणार नाही.

### २) प्रमाणाचे तत्व :

नि:शस्त्रीकरणाच्या बाबतीत दुसरा अडथळा म्हणजे निशस्त्रीकरणाचे प्रमाण ठरविणे हा आहे. राष्ट्राने कोणत्या प्रमाणात नि:शस्त्रीकरण करावे किंवा कोणती शस्त्रे किती प्रमाणात नष्ट करावी आणि त्याचे उत्पादन किती प्रमाणात करावे हे ठरविणे फारच ?? आहे. कारण प्रत्येक राष्ट्राजवळ एकसारखीच शस्त्रास्त्रे नसतात. त्यांचे उत्पादनही कमी जास्त प्रमाणात असते. १९३२ च्या जागतिक नि:शस्त्रीकरण परिषदेत फ्रान्स आणि जर्मनी नि:शस्त्रीकरणाचा समतोलपणा हे तत्व नाकारले होते.

### ३) शस्त्रास्त्राने उत्तम संरक्षण होते :

शस्त्रास्त्राच्या सहाय्याने सुसज्य राहुन संरक्षण चांगल्या प्रकारे होते. हे संरक्षण खात्रीलायक आहे. अशीच समजुत राष्ट्रा-राष्ट्रात झाली आहे. निश:स्त्रीकरणाने संरक्षण होईलच अशी खात्री राष्ट्रांना वाटत नाही. म्हणून कोणतेही राष्ट्र सहासहजी नि:शस्त्रीकरणास तयार होत नाही.

## ४) पद्धती ठरविणे कठीण :

निशस्त्रीकरणाच्या बाबतीतला आणखी एक अडथळा निरनिराळ्या शस्त्रांची आणि त्यांची परिणामकारकता नष्ट करण्याची पद्धती ठरविणे कठीण आहे. शस्त्रास्त्रामुळे राज्याला सुरक्षितता वाटते. त्यामुले अशी शस्त्रास्त्रे नष्ट करण्यास राज्य तयार होत नाही. तसेच प्रत्येक शस्त्राची व अस्त्राची परिणामकारकता असते. प्रत्येक राष्ट्राजवळ एकसारखी व एकाच पद्धतीची शस्त्रास्त्रे नसतात. त्यामुळे कोणती शस्त्रास्त्रे आणि ती किती प्रमाणात नष्ट करावी? हे ठरविणे कठीण झाले आहे.

## ५) नि:शस्त्रीकरण केले काय? ते ठरविणे कठिण :

प्रत्येक राष्ट्र त्यांच्याजवळ असलेल्या शस्त्रास्त्र भांडाराची, उत्पादन क्षमतेची आंतरराष्ट्रीय संघटनेकडून किंवा इतर देशांकडून चाचणी करू देण्यास तयार होत नाही. त्यामुळे नि:शस्त्रीकरणाद्वारे देशांनी किती प्रमाणात नि:शस्त्रीकरण केलेले समजणे कठिण आहे.

## ६) हेरगिरीचा प्रयत्न :

नि:शस्त्रीकरणाच्या बाबतीतला आणखी एक अडथळा म्हणजे राष्ट्रा-राष्ट्रांचा परस्परांवर असणारा अविस्वास हा आहे. नि:शस्त्रीकरणाबाबत आजपर्यंत अनेक ठराव आंतरराष्ट्रीय कराराद्वारे मान्य केले. त्यासाठी निरीक्षण करावे हे तत्वसुद्धा मान्य करण्यात आले. परंतु प्रत्यक्षात निरीक्षणाच्या नावाखाली महाशक्तीची राज्ये हेरगीरी करतात. असाच समज निर्माण झाला. अशा अविस्वासाच्या वातावरणात नि:शस्त्रीकरण करणे शक्य आहे, असे सुकझर म्हणतो.

## ७) स्पर्धांच्या युगात अण्वस्त्रांना महत्व :

आजचे युग स्पर्धेचे युग आहे. त्यामुळे नि:शस्त्रीकरण करून आपली राष्ट्रीय शक्ती खच्ची करण्यास साधारणत: कोणतेही राष्ट्र तयार होत नाही. आज आपणही अण्वस्त्रधारी राष्ट्र बनले पाहिजे, अशी समजुत विकसनशील राष्ट्रांची झाली आहे. भारत आणि पाकिस्तान ह्यांनी अण्वस्त्रनिर्मिती केली. अशी राष्ट्रे नि:शस्त्रीकरण स्वीकारून आपला प्रभाव कमी करण्यास कधीच तयार होत नाही. कारण ह्या अण्वस्त्रांच्या साहाय्यानेच ही राष्ट्रे इतर क्षेत्रात आपली प्रगती करीत आहेत.

## नि:शस्त्रीकरणाच्या बाबतीत भारताची भुमिका

भारताने अलिप्तता धोरण स्विकारले आहे. भारत हा शांतताप्रीय देश आहे. ''जगा आणि जगु द्या'' ह्याच धोरणाचा भारताने स्वीकार केला आहे. पंचशील तत्वाचा भारताने स्वीकार केला आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकारच्या युद्धाची भारत कधीच समर्थन करीत नाही. आतापावेतो झालेल्या अनेक नि:शस्त्रीकरण संमेलनात आणि अण्वस्त्र बंदी विषयीच्या संमेलनात भारताने नि:शस्त्रीकरणाबाबतचे आपले मत स्पष्टपणे मांडताना असे सांगितले की, निशस्त्रीकरण करून शस्त्रास्त्राची स्पर्धा थांबवावी. परमाणु प्रतिबंधक संधीक भारताने तात्विक विरोध दर्शवुन संधीवर स्वाक्षरी करण्याचे नाकारतांना असे स्पष्टपणे केले की, ''परमाणुचा उपयोग भारत शांततेसाठी आणि राष्ट्रीय विकासासाठीच त्याचा दुरुपयोग जागतिक शांता भंग करण्यासाठी, इतर राष्ट्रांना धमकी देण्यासाठी आणि त्याच्या स्वातंत्र्याने अपहरण करण्यासाठी करार नाही. भारताच्या शेजारील राष्ट्रे चीन आणि पाकिस्तान ही अण्वस्त्रधारी राष्ट्रे आहेत, त्यांना खंबीर आणि यशस्वी उत्तर देण्यासाठी भारत अण्वस्त्रधारी होणे ही काळाची गरज आहे.'' त्यासाठी भारताने १९९४ मध्ये पोखरण येथे यशस्वीपणे आण्विक चाचणी केली होती.

ह्याचा अर्थ भारत नि:शस्त्रीकरणाच्या विरोधी आहे. असे न ?? भारताने अलिप्तता धोरण स्विकारून महाशक्तीच्या दोन्ही राष्ट्रामध्ये शस्त्रास्त्र स्पर्धा करण्याचे, त्यांच्यातील संघर्ष टाळण्याचे प्रयत्न करून त्यांच्यामध्ये सामज्यस्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला. शस्त्रास्त्रावरील होणारा खर्च कमी करून त्याचा सदुपयोग ?? विकासासाठी करावा हाच आहे.

## अण्वस्त्रांच्या संदर्भात नि:शस्त्रीकरणाचे प्रयत्न

अण्वस्त्रांच्या संदर्भात नि:शस्त्रीकरणाला विशेष महत्व आहे. कारण ??ची जागतीक संहारक शक्ती हेच आहे. जोपर्यंत अण्वस्त्रांची निर्मिती पुर्णपणे थांब?? तोपर्यंत नि:शस्त्रीकरण आणि जागतीक शांतता निर्माण होणे शक्य नाही. अण्वस्त्रे शत्रुचा नि:पात करतात तसाच अण्वस्त्राची लहानशी चुक ही अण्वस्त्रधारी राष्ट्राचा ?? धडविण्यास कारणीभुत ठरतात.

१९४५ ते १९४८ पर्यंत अमेरीका हे एकमेव अण्वस्त्रधारी राष्ट्र परंतु १९४९ साली सोव्हिएट रशिया, नंतर ब्रिटेन आणि १९८५ मध्ये पाकिस्तान अण्वस्त्रधारी राष्ट्रे बनली. अण्वस्त्राचा दुरुपयोग टाळावा, त्यांच्यावर नियंत्रण प्रस्थापित करावे ह्या दृष्टिने ज्या जागतिक परिषदा झाल्या त्यांचा थोडक्यात विचार करणे ??.

## जागतीक परिषदा

### १) सहा राष्ट्रांची १९८५ सालची दिल्ली परिषद :

अर्जेन्टीना, ग्रीस, स्विडन, टॅगानीका आणि भारत ह्यांची दिल्ली येथे २८ जानेवारी रोजी परीषद झाली. त्या अण्वस्त्रधारी राष्ट्रांनी अण्वस्त्राची चाचणी बंद करणे अशी विनंती करण्यात आली.

### २) रीगन, गोर्बाचेव्ह परिषद १९८५ :

अमेरीका अध्यक्ष रीगन आणि रशियन गोर्बाचेव्ह ह्यांची १९८५ च्या अखेरीस जिनेव्हा येथे बैठक झाली. त्यामध्ये अण्वस्त्रे समाप्तीबाबतचा विचार झाला. परंतु १५ वर्षात अण्वस्त्राची क्रमश: समाप्ती करावी ह्या रशियाच्या ठरावाला अमेरिकेने संमती न दिल्यामुळे ही परिषद निरर्थक ठरली.

### ३) रेवजावीक परिषद १९८६ :

ऑक्टोंबर १९८६ मध्ये पुन्हा गोर्बाचेव्ह आणि प्रे. रीगण ह्यांची नि:शस्त्रीकरणाबाबत रेवजाविक येथे बैठक झाली. परंतु स्ट्रेटेजिक डिफेन्स एनिशिएटीव्ह प्रोग्रामबाबतचे संशोधण केवळ प्रयोगशाळेपुरतेच मर्यादीत असावे, असे रशियाचे विचार अमेरिकेने अमान्य केल्यामुळे बैठक निष्फल ठरली.

### ४) क्षेपणास्त्राबाबतची संधी :

वॉशिंग्टन येथे १९८७ मध्ये पुन्हा प्रे. रिगन व गोर्बाचेव्ह ह्यांची बैठक झाली. त्यामध्ये ५०० ते ५००० किलोमीटर परिक्षेत्रातील क्षेपणास्त्राचे उच्चायन करण्याचे ठरले. यानुसार अमेरिकेने ८५९ व सोव्हीएट रशियाने १७५२ क्षेपणास्त्रेचे अड्डे नष्ट करण्याचे मान्य केले.

### ५) अंतराळातील नि:शस्त्रीकरण कार्यक्रम :

त्यानंतर जुन १९८९ मध्ये अंतराळातील नि:शस्त्रीकरण कार्यक्रमाबाबतची संधी अमेरीकेच्या विरोधामुळे झाला नाही.

### ६) वाशिंग्टन सभा :

१ मे १९९० रोजी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बुश आणि रशियन अध्यक्ष गोर्बाचेव्ह ह्यांच्यामध्ये नि:शस्त्रीकरणाबाबतचा एक करार झाला आणि दोन्ही राष्ट्रांनी हजारो टन शक्तीची शस्त्रास्त्रे नष्ट करण्याचा करार केला. २७ सप्टेंबर १९९१ रोजी युरोपच्या भुमीवरून सर्व अण्वस्त्रे व क्षेपणास्त्रे काढून घेण्याची एकतर्फी घोषणा राष्ट्राध्यक्ष बुश ह्यांनी केली. त्यानुसार शीतयुद्ध समाप्तीच्या दृष्टिने चांगले वातावरण तयार झाले.

त्यानंतर अमेरिका आणि रशिया ह्यांच्यामध्ये १६ जुलै १९९२ रोजी वॉशिंग्टन येथे एक करार झाला. त्यानुसार दोन्ही देशांनी आपली अण्वस्त्रे सिमीत करण्याचा निर्णय घेतला.

अशा प्रकारे अण्वस्त्राच्या क्षेत्रात नि:शस्त्रीकरण करण्याचे जे प्रयत्न झाले, ते सर्व यशस्वी झाले नाही तरी अण्वस्त्राचे नि:शस्त्रीकरण करण्याचे जे प्रयत्न झाले, ते सर्व यशस्वी झाले नाही तरी अण्वस्त्रेचे नि:शस्त्रीकरण करणे आवश्यक आहे ही जाणीव महाशक्तीच्या राष्ट्रांना आली. अण्वस्त्रामुळे युद्ध झाले तर कोणाचेही हित साध्य होणार नाही. अण्वस्त्राच्या दुरुपयोगामुळे विनाश अटळ आहे. ही जणीव झाल्यामुळेच नि:शस्त्रीकरणाला अधिक चालना मिळाली ही गोष्ट मान्य करावीच लागेल.

## ५.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

(१) राजनय म्हणजे काय ? राजनयाचे जागतिक राजकारणातील भुमिका स्पष्ट करा.

(२) राजनयाच्या बदलत्या स्वरुपाबद्दल चर्चा करा.

(३) आंतरराष्ट्रीय कायदा म्हणजे काय सांगून त्याचे महत्व विशद करा.

(४) संयुक्त राष्ट्रसंघाची जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठीच्या प्रयत्नांची चर्चा करा.

(५) टिपा लिहा.

(अ) निशस्त्रीकरण

(ब) शस्त्रनियंत्रण

## ५.४ सरावासाठी स्वाध्याय

(१) राजनयाच्या विविध प्रकारांची चर्चा करा.

(२) राजनयाची 'सत्ता आणि संघर्षाच्या' संदर्भातील भूमिका स्पष्ट करा.

(३) ''राजनय हे युद्ध टाळण्यासाठी आवश्यक असे साधन आहे'' चर्चा करा.

(४) आंतरराष्ट्रीय कायद्याचे बहूध्रुविय सत्ताकारणातील महत्व विशद करा.

*****